म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय नाटक
दा. क्र. २२४६४
IRBK-0122464

वाचनालय ना१२७
२२७६४
२२।७।८८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

24 MAR 1998

(क्रु. गा. पद्दा)
५०००-११-८६

# मुलगा झाला हो!!

(उपहासात्मक विडंबन नाट्य)

संभाजी महाडीक

प्रस्तावना : ज्ञानेश्वर नाडकर्णी

IRBK-0122464

राजीव प्रकाशन
६ अ, जगन्नाथ शंकरशेट रोड, मुंबई–४०००००७.

आवृत्ती पहिली नोव्हेंबर १९८७

मूल्य २० रुपये

हक्क :

पहिल्या आवृत्तीच्या प्रकाशनाशिवाय सर्व हक्क लेखकाधीन. कोणत्याही कारणासाठी लेखी परवानगी आवश्यक.

लेखकाचा पत्ता :

संभाजी महाडीक,
३/८२, ॐ त्रिमूर्ती हाऊसिंग सोसायटी,
चुनाभट्टी, सायन, मुंबई–४०००२२.

प्रकाशक :

अण्णा फणसे,
'राजीव प्रकाशन'
६, अ जगन्नाथ शंकरशेट रोड, गोकुलदास देवजीवाडी,
गांवदेवी, मुंबई–४००००७

मुद्रक :

नंदकुमार कृष्णा गोंधळी,
सुधीर प्रिंटींग प्रेस,
नागडोंगरी, ता. अलिबाग, जि. रायगड–४०२२०१.

मुखपृष्ठ :

निवेदिता लिमये

मुखपृष्ठ छपाई :

त्रिमूर्ति प्रिंटर्स

# ऋण !

माझी सुविद्य पत्नी...

**सौ. सुजाता** बी. ए. बी. एड्.

विभाग अधिकारी,

बृहन् मुंबई महानगरपालिका,

शिक्षण विभाग.

हीस......

कृतज्ञतापूर्वक अर्पण.

**—संजी**

# प्रास्ताविक

'मुलगा झाला हो !!' या नाटकात एक प्रचलीत समस्या श्री. संभाजी महाडीक यांनी फार चटपटीतपणे हाताळलेली आहे. जरी या नाटकाच्या शीर्षकाचा संदर्भ आजकाल लोकप्रिय झालेल्या एका स्त्रिमुक्तिवादी नाटकाला लागत असला तरी श्री. महाडीक यांनी आपला विषय स्वतंत्रपणे हाताळलेला आहे. लेखकाचा विनोद अवखळ आहे आणि आपल्या विडंबनात त्याने खूपच धाष्टर्य दाखविलेले आहे. कदाचित त्यातील काही संदर्भ प्रेक्षकांना वृत्तपत्रीय वाटतील, परंतु नाटककाराने आपल्या कृतीला एक नवा, अभिनव घाट दिलेला आहे. हे स्तुत्य आहे.

समाजाच्या भिन्नथरांना स्पर्श करणारे अनेक प्रश्न हसतखेळत सोडविण्याचा श्री. महाडीक यांचा प्रयत्न आहे. या प्रयत्नाकडे प्रेक्षकांनी खिळाडूपणाने पाहिले पाहिजे. प्रेक्षक व नाटककार यांचे सामंजस्य 'मुलगा झाला हो !!' या नाटकाच्याद्वारे वाढीला लागेल. अशी मला आशा आहे.

—ज्ञानेश्वर नाडकर्णी

३५६
म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. २२४६४ नों. दि २२।४।९८
वि. ...नाटक... क्र. ..................

# अंक पहिला

(परंपारिक पद्धतीनं साथीसह जुन्या नाटकार्त ल नांदी म्हणतात)

**सूत्रधार** : झालं एवढं ईशस्तवन पुरे! (परिपार्श्वक जातात) वाहवा! सुंदर, चित्रविचित्र विविधरंगी पुष्पांनी शोभणाऱ्या कुसुमवाटिकेप्रमाणे ही, प्रसन्नमुख सभा पाहून मनाला आनंद होतो. परतु आता कोणत्या नव्या प्रकारच्या नाटकानं हिचं रंजन करावं हेच समजत नाही. कारण आजकाल लोकांची अभिरुची कळेनाशी झाली आहे. तेव्हा या प्रसंगी माझ्या सुविद्य, सुकेशभूषा, सुवेशभूषा प्रियेचा अभिप्राय घ्यावा आणि तो घेण्यासाठी तिला पाचारण करावे. कोण आहे रे तिकडे? (स्वत:च) कोणीही नाही. कोण आहे रे इकडे? (स्वत:च) कोणीही नाही. लोकसत्ताक राज्यात इकडे वा तिकडे कोणीच नमतं नसल्यामुळे, इकडून वा तिकडून कुणाचंच येणं होत नाही. तेव्हा प्रियेला स्वत:च हाक मारावी. प्रियेऽऽएऽऽप्रिये. (आतून कमिंग डार्लिंग कऽऽमींग) रसिक, प्रेक्षक हो, माझी प्रिया आगमन करते आहे. प्रियेऽऽएऽऽप्रिये.

**प्रिया** : (वय २२ ते २३ फिट्ट जिन्स. वर टॉप. बॉब किंवा बॉयकट् केलेली. संगीताच्या तालावर नाचत येते.)

**डार्लिंग डार्लिंग काय म्हणतोस ?**
**डार्लिंग डार्लिंग काय म्हणतोस ?**
**भलताच बाईल वेडा दिसतोस !**

डाऽलिंग मी आलेऽऽ (एक गिरकी घेऊन त्याच्या समोर उभी राहते)

**सूत्रधार** : ओ हो हो! तू हे काय परिधान केले आहेस ?

**प्रिया** : डार्लिंग अन्न, पाणी, वस्त्र आणि निवारा यातील मी 'वस्त्र' परिधान केले आहे.

**सूत्रधार** : एवढं तोकडं ?

**प्रिया** : माझ्या वाटणीस हे एवढंच आलं !

सूत्रधार : एवढंच का ?

प्रिया : कारण माणसांची संख्या बेसुमार वाढली.

सूत्रधार : मग त्या त्रिकोणाचं काय झालं ?

प्रिया : त्रिकोणाचा प्रथम चौकोन नंतर षट्कोन आणि शेवटी बिन्टोकाचं वर्तुळ झालं !

सूत्रधार : म्हणजे तू अब्रूरक्षणापुरतं वस्त्र परिधान केलं आहेस.

प्रिया : पण डार्लिंग अब्रूचा आणि वस्त्राचा काय संबंध ?

सूत्रधार : सुटसुटीतपणासाठी तुला सूट होईल असं कोणतंही वस्त्र तू परिधान कर. पण त्याचा त्याग मात्र करू नकोस. ते असो ! पण प्रिये, तुझ्या चंद्रमुखी चेहऱ्यावर नेहमी रुळणारी आणि रसिकजनांना हवीहवीशी वाटणारी, तुझ्या कपाळावरची ती, केसाची कुरळी बट काय झाली ?

प्रिया : किती बावळट आहेस रे तू डार्लिंग ! अरे; केसांची ती कुरळी बट् कट् करून मी बॉबकट् केला. लाऽऽ लाऽऽ लाऽऽऽ (गिरकी घेत) आता ही ब्युटीपार्लरमधूनच येते आहे म्हणून लेट झाला.

सूत्रधार : अरे व्वा ! छान दिसतेस की ! पण काही पुरुषी अंगलटीच्या स्त्रिया व मुली वयाला न शोभणारा बॉयकट् करतात त्या मात्र हनुमान छाप बाप्यासारख्या दिसतात. ते काटाछाटीचे असो ! हा ज्याच्या त्याच्या आवडीनिवडीचा प्रश्न आहे. मी तुला अशासाठी पाचारण केलं की, विकसित फुलासारख्या या प्रसन्नमुख सभेचं रंजन करण्यासाठी आज कोणतं नाटक सादर करावं ?

प्रिया : (एकदम खूप हसून) **डार्लिंग डार्लिंग काय म्हणतोस ?**

**भलताच नाटक एडा दिसतोस !**

डार्लिंग तू किती येडा म्हणजे मॅड आहेस रे ! अरे, गेले चार दिवस जाहिरात केलेलं नाटकच पाहायला प्रेक्षक आले आहेत आणि आत्ता, इलेवंथ अवरला तू माझी परवानगी घेतो आहेस ? (खूप हसते)

सूत्रधार : मराठी रंगभूमीची अशी परंपरा आहे, की, प्रियेशी म्हणजे नटीशी चर्चा करावी.

प्रिया : फक्त चर्चाच करायला सांगितलं आहे ना ?

सूत्रधार : हो !

**प्रिया** : मग कर.

**सूत्रधार** : प्रिये, आजकालच्या प्रेक्षकांची अभिरुचीच कळेनाशी झाली आहे. 'सेक्स' वरची नाटके पाहून हॉट झाल्यामुळे, वखवखलेल्या प्रेक्षकांना प्रसन्न करण्यासाठी एखादा नवा नाट्यप्रकार तू सांगू शकशील काय ?

**प्रिया** : एकदम न्यू ब्रॅंड ..? नाही सांगता येणार--

**सूत्रधार** : का बरं ?

**प्रिया** : सांगते, ऐक कारण... . ,

**नाटकाची धाव आहे;**
**नाटकापासून नाटकाकडे;**
**शेक्स्पीयरपासून मोलियरकडे;**
**कीर्तनापासून तमाशाकडे;**
**इतिहासाला गेले तडे;**
**पूर्वी घडले तेच घडे;**
**हिस्ट्री इज रिपिटेड, हिस्ट्री इज रिपिटेड**
**नाटकाची धाव आहे नाटकापासून नाटकाकडे.**
**तुकारामापासून सखारामाकडे;**
**घाशिरामपासून घाशिरामकडे;**
**चिपळूणपासून गुहागरकडे;**
**व्हाया रत्नागिरी गोव्याकडे;**
**आनंदी आनंद गडे**
**इकडे तिकडे चोहिकडे**
**नाटकाची धाव आहे मुंबईपासून इंग्लंडकडे**
**हरेकृष्ण हरे रामा !**
**ड्रामा ड्रामा ड्रामा लाइफ इज ए ड्रामा**
**ऽ रा ऽ रा ऽ रा ऽऽ रा ऽऽ**

तेव्हा डार्लिंग, तुला हवा तसा नाटकाचा नवा प्रकार मला सांगता येणार नाही.

**सूत्रधार :** प्रिये, तरीही विचार कर, विचार केला की आचार सुचतो.

**प्रिया :** (विचार करून) अय्या ! बेस्ट आयडिया ! आपण, होल मधून पहायच नाटक सादर करूया. काय मज्जा येईल नाही ? जितके प्रेक्षक तितकी भोकं ! होल्स !

**सूत्रधार :** नाही चालणार ! भोकातून पाहायचं 'अवध्य', नाटक 'अवध्य' असूनही लोकांनी त्याचा वध केला.

**प्रिया :** मग आपण असं करू या ! वयात आलेलं नाटक सादर करू. या, मंडळी सादर करू या..., वयात आलेलं नाटक.

**सूत्रधार :** नाही करता येणार !

**प्रिया :** अस काय रे डार्लिंग, तू काहीच करत नाहीस. अशानं आम्ही नाही जा, गट्टी फू !

**सूत्रधार :** प्रिये; पुरे आता तो रुसवा फुगवा ! रसिक प्रेक्षक प्रयोगासाठी केव्हाचे ताटकळून राहिले आहेत !

**प्रिया :** मग, वयात आलेलं नाटक का नको ?

**सूत्रधार :** अगं ते वयात आलेलं नाटक केव्हाच प्रौढ झालं !

**प्रिया :** हाऊ एक्सलंट ! मग आपण नाट्यपरिक्षण मंडळाकडून डबल 'ए' सर्टिफिकेट घेऊन ते फक्त चावट प्रेक्षकांसाठी सादर करू.

**सूत्रधार :** प्रिये, काय हे औद्धत्य ! रसिक प्रेक्षकांना चावट म्हणतेस ?

**प्रिया :** सॉरी डार्लिंग ! आपण ते प्रौढ प्रेक्षकांसाठी सादर करू. तेव्हा, रसिक प्रेक्षकहो ! आपल्यापैकी जे प्रौढ नसतील त्यांनी कृपया बाहेर जावे. आईच्या कडेवर बसून आलेल्यांनी थांबायला हरकत नाही. मात्र त्यांना मधेच पिपाणी मात्र वाजवू नये.

**सूत्रधार :** मायबाप प्रेक्षकहो ! कुणीही बाहेर जायची गरज नाही.

**प्रिया :** आत्ता काय झाल ?

**सूत्रधार :** अग, ते प्रौढ झालेलं नाटक मॅरेजशिवाय प्रेग्नंट राहिलं !

**प्रिया :** **डार्लिंग डार्लिंग काय म्हणतोस ?**
**अगदीच आक्रित काय बोलतोस ?**

**सूत्रधार :** प्रिये, हे आक्रित नसून मराठी नाटकाच्या या प्रायोगिक अवस्था आहेत.

**प्रिया** : या अवस्थांचा तुझ्या नाटकाशी काय संबंध ?

**सूत्रधार** : कारण, नाटक हे जीवनाचं चित्र आहे आणि माझं नाटक हे बदल घातल्या जाणाऱ्या जीवनाचं चित्र आहे !

**प्रिया** : अच्छा ! प्रेग्नंट अवस्थेत असलेलं ते नाटक बाळंतपणासाठी कोणत्या हॉस्पिटलमधे गेलं आहे ?

**सूत्रधार** : कशासाठी ही चौकशी ?

**प्रिया** : अरे, आधी वयात येऊन मग प्रौढ झालेलं आणि विदाऊट मॅरेज प्रेग्नंट राहिलेलं ! हे प्रगतिशील नाटक न्यू ब्रँड नाटकालाच जन्म देणार ! म्हणून हे नवनाट्य बालक आपण सादर करू या. रसिक प्रेक्षक हो ! तुम्ही जरा इथेच थांबा. मी बाळंतपणाच्या हॉस्पिटलमधे जाऊन येते. (जाऊ लागते)

**सूत्रधार** : प्रिये; प्रिये, मागे फीर ! घात झाला !

**प्रिया** : काय झालं ?

**सूत्रधार** : अनौरस संतती नको म्हणून त्या प्रग्नंट नाटकानं अॅबॉर्शन करुन घेतलं !

**प्रिया** : हाय रे देवा ! अॅबॉर्शनची परवानगी दिल्यामुळे हे असं झालं !

**सूत्रधार** : बाळ गेलं तरी बाळंतीण सुखरूप आहे. शो मस्ट गो ऑन !

**प्रिया** : डार्लिंग, नवनाट्याच्या शोधात घरंगळत जाऊ नकोस ! प्रेक्षकांत माधवराव बसले आहेत–विषयला धरून बोल !

**सूत्रधार** : कोण माधवराव ? पेशवे, गडकरी की मनोहर ?

**प्रिया** : माधव मनोहर !

**सूत्रधार** : अरे बापरे ! मग आधीच का सांगितलं नाहीस ?

**प्रिया** : अरे, तू जसा तुझ्यासारखाच आहेस. तसंच तुझं नाटकही तुझ्या सारखंच आहे. म्हणून ते इतराहून वेगळं आहे. तेव्हा डार्लिंग, माझ्याशी चर्चा करण्याचं नाटक बंद करून तुझ्या आजच्या नाटकाचं पूर्वीच ठरविलेलं नाव जाहीर कर.

**सूत्रधार** : असं म्हणतेस ? रसिक प्रेक्षकहो ! माझ्या नाटकाचं नाव आहे; 'मुलगा झाला हो !!' (डाव्या व उजव्या बाजूने पिकी बाळ शक्यतर आणखी स्त्री पुरुषांचा ताफा प्रवेश करतो)

अग ग मुलगा जाहला

काय मी करू मुलगा जाहला

कसं मी करू मुलगा जाहला

कुणाला मी सांगू मुलगा जाहला

कसं मी सांगू मुलगा जाहला

'बर्फी' घ्या मुलगा जाहला

पुंडलिका वरदे मुलगा जाहला

ज्ञानदेव तुकाराम मुलगा जाहला

(आता प्रियाच स्त्रियांची सूत्रधार झाली.)

**पिंकी** : (वय १४ ते १६ वेश-भूषा प्रियासारखीच अत्याधुनिक) या नाटकाला आमचा विरोध आहे !

**प्रिया** : हे नाटक आम्ही होऊ देणार नाही !

**सूत्रधार** : तुमचा म्हणजे नक्की कुणाचा ? तुम्ही कोण ?

**बाळ** : (वय २०-२१ वर्षे तरुण अत्याधुनिक) आतून पुरुष वरून बायका.

**प्रिया** : आम्ही कोण ? आम्हाला तुम्ही ओळखत नाही ?

**सूत्रधार** : नाही.

**प्रिया** : आम्ही कोण म्हणूनी काय पुसशी थोबाड फेंदाडुनी

मेल्यानो सावधान चित्ती आयका आम्ही असू बायका

**सूत्रधार** : प्रिये तू सुद्धा ?

**बाळ** : ब्रूटस इव्हन यू !

**प्रिया** : मी कुणाची प्रिया नाही. मी कुणाची पत्नी नाही. मी कुणाची माता नाही.

**सूत्रधार** : प्रिये, असं कठोर बोलू नकोस.

माता भगिनी आणि साजणी

पदे पवित्र ही जगतालागुनी

तुझ्या नयनातलं पाणी आणि हृदयातलं अमृत गेलं तरी कुठं ?

**पिंकी** : स्त्रियांना गुलामगिरीत ठेवण्याचा हा तुमचा पुरुषी कावा आहे. या साजूक तुपासारख्या नाजूक नात्यानीच आमचा घात केला आहे.

**बाळ** : मग बायका असूनही बायकांसारख्या न वागणाऱ्या तुम्ही आहात तरी कोण ?

**प्रिया** : पुरुषी जोखड झुगारून देण्यासाठी सज्ज झालेल्या; कसलंही पुरुषी बंधनं न पाळणाऱ्या, आम्ही आहोत जागृत महिला.

**सूत्रधार** : कुणाच्याही आया वा कुणाच्याही बाया नसलेल्या आणि मोकाट सुटलेल्या स्त्रियानो !

**पिंकी** : खबरदार आम्हाला मोकाट सुटलेल्या म्हणाल तर !

**बाळ** : मग तुम्हाला काय म्हणायचं तुम्हीच सांगा.

**प्रिया** : हवं तर 'मुक्त' वा 'विमुक्त' स्त्रिया म्हणा.

**सूत्रधार** : पर्यायी शब्द म्हणून 'भटक्या' किंवा 'उंडग्या' स्त्रिया म्हटलं तर चालेल ?

**प्रिया** : चेष्टा कराल तर क्रांतीच्या वणव्यात जळून जाल.

**बुद्ध नको मज युद्ध हवे**
**शांती नको मज क्रांती हवी**
**बंदी नको मज मुक्ती हवी**
**मुक्तीसाठी शक्ती हवी**
**क्रांती क्रांती क्रांती**

**सूत्रधार** : हे क्रांतिकारी स्त्रियानो, हशीलदान मागणाऱ्या कृष्णाप्रमाणे आमच्या नाटकाला अडथळा करू नका—कसलं दान हवंय तुम्हाला ?

**बाळ** : तुमच्याकडे नसेल ते आम्ही तुम्हाला देऊ. तेवढीच सांस्कृतिक देवाण घेवाण.

**पिंकी** : लिंगपिसाटानों, आम्हाला दान नको आहे. लिंगभेदावर आधारलेली पुरुषप्रधान समाजरचना आम्हाला नष्ट करायची आहे.

**प्रिया** : पुरुषप्रधान संस्कृतीचा आणि अरेरावीचा धिक्कार असो.

**धिक्कार असोऽ धिक्कार असोऽऽऽ**
**या मेल्या पुरुषांचा;**
**जे सांगती रांधा, वाढा, उष्टी काढा**
**जन्मा घाला पोरांना;**

वरती आणिक त्यांना
अंगावरती पाजा
धिक्कार असो, धिक्कार धिक्कार असो
या मेल्या पुरुषांचा

(मार्चिंग साँगचे सूर. मार्चिंग करीत एक फेरी मारतात व आव्हानात्मक पवित्रा घेऊन उभ्या राहातात.)

**प्रिया** : हे नाटक आम्ही होऊ देणार नाही !

**सूत्रधार** : नाटक केल्याशिवाय आम्ही रहाणार नाही !

**बाळ** : मुकाट्यानं रंगमंच मोकळा करा !

**प्रिया** : अनादी काळापासून मनुस्मृती प्रणित पुरुषप्रधान समाजात आमचा छळ अनेक मार्गांनी झाला आहे. आता आम्ही हे सहन करणार नाही.

द्या मज कुणीतरी शस्त्र दुधारी
उचलीन मी ते प्राणपणाने
तोडुनी टाकीन वटवृक्षाच्या
जीर्णशीर्ण फांद्या;
ज्या फांदीवर बसला होता मनुस्मृतीवाला
धिक्कार असोऽ धिक्कार असो
या मेल्या पुरुषांचा

**पिंकी** : (घोषणा) नही चलेगी नही चलेगी मर्दोकी मर्दानी नही चलेगी— आम्ही इंचाइंचावर उभ्या राहून लढू.

**प्रिया** : पोळपाटाच्या ढाली करून रक्ताचा शेवटचा थेंब सांडेपर्यंत आम्ही लढू !

**सूत्रधार** : सपाट पोळपाटाशिवाय तुमच्या हातात आहेच काय दुसरं ? जरा काही झालं की, काढलेच पोळपाट.

**बाळ** : तुम्ही पोळपाटाची ढाळ केली तर आम्ही लेखणीची तलवार करू.
(समोरा समोर उभे राहून घोषणा देतात)

: आम्ही नाटक करू देणार नाही !
: नाटक केल्याशिवाय आम्ही राहणार नाही !

(वगैरे घोषणाचा गदारोळ. युद्धसंगीत सुरू क्षणभर कराटे वगैरेची झटापट. नंतर आकाशवाणी व्हावी तसं गीत व संगीत)

**युद्ध नको मज शांती हवी**
**क्रांतीसाठी शांती हवी**
**शांती शांती ॐ शांती**

(एकदम शांतता)

**प्रिया** : कुणी दिला हा संदेश ?

**पिंकी** : आकाशवाणीने.

**प्रिया** : ठीक आहे. घ्या ग पोळपाट खाली. शक्यतो आपण बापुजींच्या मार्गाने जाऊ नाही तर शेवटी रक्तपात आहेच.

**सूत्रधार** : लेखण्या तशाच राहू द्या ! युद्ध संपल्यासारखी वाटली तरी ती कधीच संपत नसतात. तशात हा स्त्रियांशी मुकाबला आहे.

**बाळ** : अबला, अबला म्हणून आम्ही गप्प बसलो तर आमच्याच डोक्यावर चढून बसलात !

**सूत्रधार** : काय केली आम्ही अरेरावी ?

**प्रिया** : आपलं वर्चस्व स्त्रियांवर राहावं म्हणून धर्माचा आणि बळाचा वापर करून आजवर आमचा अनंत प्रकाराने छळ केलात. त्यातलाच एक प्रकार म्हणजे.........

**पिंकी** : जिला नवरा म्हणजे काय कळत नाही. सती जाणं म्हणजे काय कळत नाही. तिला मृत पतीच्या चितेवर रचून तिच्या मनाविरुद्ध जाळून टाकण्याचे सोहळे साजरे करीत आलात ! पहायचं आहे......ऽ (काळोख)

**निवेदन** : पुरुषी क्रौर्याच्या इतिहासाचं हे पहा एक काळंकुट्ट पान. सती जाण्याचा अमंगल जुलमी सोहळा (मागील उंच लेव्हलवर चित्तथरारक दृश्य सुरू होतं.)

**गृहस्थ** : (जाणाऱ्या भटजीला) भटजीबुवा ! भटजीबुवा, जरा थोपा. एव्हड्या गडबडीत चाललात कोठे ?

**भटजी १** : मसणात !

**गृहस्थ** : ते हो कशाला ?

**भटजी १** : सरण रचायला !

**गृहस्थ** : मरण कुणाचे ?

**भटजी १** : रांडेच्या तुझ्या बापसाचे. तुस ठाऊकी नसे ? रास्त्यांचा सोळा वर्षांचा पुत्र स्वर्गवासी झाला त्यांची आठ वर्षाची सून सती जाते आहे. त्या गडबडीत मी आहे रांडेच्या दूर हो ! ओवळे करशील !

**भटजी २** : (प्रवेशून) ओहो हो ! काय पुण्याई ! काय थोरवी ! एव्हडीशी पोर भरल्या चुडयाने, भरल्या मळवटाने सती जाणार ! जाणार म्हणजे जाणार ! इंद्राचे आसन तिला प्राप्त होणार ! नाही तर आम्ही भटजी रमण्यात मिळणाऱ्या दक्षिणेसाठी शंभर वर्षे जगणार ! वाहावा ! कायगो तुझे पुण्य ! कायगो तुझी पतिनिष्ठा ! कायगो तुझी धर्मनिष्ठा ! ही पहा ! ही पहा ! मारी मिरवणूक इकडेच येते आहे. (सतीची मिरवणूक वाजत गाजत येते सती अजाण बालिका आहे. तिला सती जाणे म्हणजे काय कळत नाही. स्त्रिया तिची जागोजाग ओटी भरीत आहेत. पाया पडताहेत. तिच्या पायाची धूळ कपाळी लावीत आहेत. नाना तऱ्हेने स्तुती करीत आहेत. स्त्री पुरुषांचे संमिश्र बोलणे ऐकू येते. वाद्ये वगैरे चालूच आहेत)

: केवढी ग बाई तुझी पुण्याई !

: भरल्या चुडचाने सती जाते आहे !

: पुण्यावान ग बाई !

: सोने झाले ग बाई तुझ्या जन्माचे !

: तरीच जन्मा यावे एकदातरी सती जावे !

**भटजी १** : (त्या घोळक्यातून एकदम आकाशाकडे पहात) आहो हो ! ते पाहिलेस अंतु भटा ?

**भटजी २** : कायरे शिच्या दिसते आहे ?

**भटजी १** : अरे ही देव दुर्लभ सतीची मिरवणूक पाहण्यासाठी देवांनी आकाशांत गर्दी केली आहे.

**भटजी २** : (वर पाहून खरे, रे, खरे ! ते पहा विष्णु, ते पहा महेश, ब्रह्मदेव तर चारी हातांनी पुष्पवृष्टी करताहेत. (फुले गोळा करून पदरात टाकण्याचा अभिनय)

**भटजी १** : अहो आश्चर्यम् ! अहो आश्चर्यम् ! स्वतः रमादेवी सतीच्या स्वागतासाठी उभ्या आहेत स्वर्गाच्या उंबरठ्यावर.

**भटजी २** : आवाज रे कसला अंतु भटा ? मला वाटते सतीला न्यायला पुष्पक

विमान येते आहे. (विमानाचा आवाज, आकाशाकडे पहातात. विमानाबरोबर गोल फिरतात)

**सती** : बाबा ! बाबाऽऽऽ मला सती नाही जायचं ! मला नाही मरायचं. मला आईकडे न्या. आई गऽऽ आईऽऽऽ (टाहो फोडते) मला भूक लागली आहे हो.

**भटजी १** : पुण्य पदरात पाडून घ्यायचे, ते हे कायगं विपरित बोलतेस !

**भटजी २** : धर्मबुडवी, कुळबुडवी मेली ! सती जात नाही म्हणजे काय ?

**भटजी १** : सती गेलेच पाहिजे. हा पतिव्रतेचा धर्म आहे. सर्व स्त्री–पुरुष चल, चल, चढ चितेवर असा गलका करतात. चितेचा प्रकाश रंगमंचावर दिसतो. सतीचा आक्रोश ऐकू येऊ नये म्हणून ढोल, ताशा, सनईसारखी वाद्ये वाजवितात. उंच स्वरात मंत्रघोष, अर्धवट जळलेली सती 'वाचवाहो वाचवा ! मला जाळू नका. मला जगायचे आहे' असे ओरडत रंगमंचावर येते. भटजी तिला लांब काठ्यानी चितेकडे ढकलतात जोरदार मंत्रघोष, काळीज भेदून टाकणारी सतीची किंकाळी. किंकाळीच्या परिणामामुळे स्मशान–शांतता, काळोख हळू हळू रंगमंच उजळतो. पिंकीच्या डोळ्यात अश्रू)

**प्रिया** : (रागाने थरथर कापत व अश्रू आवरीत) पाहिलात हा अन्याय मनुस्मृतीच्या काळापासून हा असा चालला आहे.

**सूत्रधार** : हा अन्याय नव्हे. आम्ही तुमच्या पावित्र्याचे आणि जीवीताचे कौमार्यापासून संरक्षण करीत आहोत.

**पिता रक्षति कौमार्ये । भ्राता रक्षति यौवने**
**वार्धक्ये पुत्र रक्षति । स्त्री स्वातंत्र्य न अर्हती**

(शेवटची ओळ पुन्हा पुन्हा प्रतिध्वनित होते)

**प्रिया** : मेल्यांनो, कसलं रक्षण केलंत, राख करुन टाकलीत आमची ! म्हणे, स्त्री स्वातंत्र्य न अर्हती. आम्हाला स्वातंत्र्य नाकारणारे तुम्ही कोण ? आम्ही आमच्या सामर्थ्यावर ते मिळवू. (आतून घोषणा. पिंकी, प्रिया साथ देतात.)

**घोषणा** : लाँग लीव्ह दी ब्राबर्निंग मुव्हमेंट.

**सर्व स्त्रिया** : ब्राबर्निंग मुव्हमेंटचा विजय असोऽऽऽ नही चलेगी, नही चलेगी पुरुषशाही नही चलेगी.

**टुणटुण ढमढेरे** : (वय ३५/४० दिसायला नावाप्रमाणे. टाईट पॅंट शर्ट वगैरे घातलेली) रात्र वैऱ्याची आहे. जाग्या रहा ! रात्र ताब्यात घ्या !

**प्रिया** : या आमच्या संस्थेच्या अध्यक्षा. मिस् टुणटुण ढमढेरे.

**टुणटुण** : कुठे आहेत ते नाटक्ये ?

**पिंकी** : हे पहा, मॅडम हेच ते नाटक्ये ?

**टुणटुण** : हे नवटाक्, छटाक् पण नाहीत. (कराटे पोझ घेऊन अंगावर धावून जाते)

**स्त्रिया** : मिस् टुणटुण ढमढरेंचा विजय असो !

**टुणटुण** : हे पहा मिस्टर नवटाक् छटाक् नाटकवाले. पुरुषप्रधान संस्कृतीचे नाटक आम्ही होऊ देणार नाही.

**सूत्र** : नाटक न पहाताच तुम्ही तसं कशावरून म्हणता ?

**टुणटुण** : चूप ! 'मुलगा झाला हो !' या नाटकाच्या नावावरूनच तुमचं सारं नाटक आमच्या लक्षात आलं. शितावरून भाताची परीक्षा करण्याची सवय आहे आम्हाला !

**सूत्र** : तुमच्यासारख्या प्रक्षोभक घोषणा आम्हालाही देता येतील. मोर्चा काढता येईल. घेराव घालता येईल. बळाचा वापर करता येईल. पण......

**बाळ** : पण आम्ही पुरुष आहोत. हवं तर मिशा ओढून बघा. आम्ही फक्त पुरुषांशीच लढतो. विषम लिंगीयांशी लढत नाही.

**सूत्रधार** : तेव्हा , (सर्व स्त्रिया फ्रीज होतात) रसिक प्रेक्षकहो ! तुम्ही हे सर्व पहात आहात. नाट्यपरिक्षण मंडळाने परिक्षण करून हे नाटक सादर करण्याची आम्हाला परवानगी दिली आहे तरीही, या व्रावनिंग मूव्हमेंटवाल्या महिला नाटक न वाचता व प्रयोग न पाहताच बळाचा वापर करून दंडेलीने नाटक बंद पाडू पहात आहेत आम्हालाही तसं करता येईल. परंतु विनयभंग करण्याची आमची इच्छा नाही. आम्ही कमलाकर सारंग यांच्या नेतृत्वाखाली कोर्टात जाऊ व खात्रीपूर्वक न्याय मिळवून परत याच नाटकाचा प्रयोग इथेच सादर करू–हीच तिकिटे पुढच्या प्रयोगाला चालतील. परंतु ज्यांना आजच पैसे परत हवे असतील त्यांनी ते कृपया तिकिट ऑफीसमधून घेऊन जावेत. आपल्याला परत जावं लागत आहे याबद्दल आम्ही अत्यंत दिलगीर आहोत. (जातात. स्त्रिया फ्रीज तोडून टाळ्या वाजवितात विजयाच्या घोषणा देतात.)

टुणटुण : माझ्या प्रिय आणि झुंजार कार्यकर्त्या भगिनीनो!! (भगिनी 'ओ' देतात) मला आनंद होतो आहे कारण तुम्ही जाग्या आहात. या रंगमंचावरच्या वा रंगमंदिरातील स्त्रियानीच नव्हे, तर तमाम जगातल्या आम भगिनीनोऽऽ, ब्रावर्निंग मूव्हमेंटच्या झेंड्याखाली या. पुरुष आपल्याला गुलामासारखे वागवितात. (शेम! शेम!) गुलामाने स्वतःचा उद्धार स्वतःच केला पाहिजे असं डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. अय्या! चुकल्ये ग चुलले डॉ. आंबेडकर हे पुरुष असल्यामुळे हे उदाहरण मी खोडून टाकीत आहे. माझ्या भाषणाच्या रिपोर्टात याचा उल्लेख करू नका. भगिनीनोऽऽ (ओ देतात) पुन्हा पुन्हा 'ओ' देऊ नका तुम्ही जाग्या आहात हे माझ्या लक्षात आहे. भगिनीनो, 'ओ' देऊ नका. आजचं नाटक आम्ही का बंद केलं?

**एक भगिनी** : आम्हाला काय ठाऊक–तुम्ही सांगितलत म्हणून बंद केलं. मुंबई बंद का करतात हे कुणाला ठाऊक असतं?

**टुणटुण** : तेच तर सांगते आहे. प्रस्थापित समाज हा लिंगभेदावर उभा आहे.

**प्रिया** : लिंग निर्मूलन समिती स्थापन करा. (गडबड)

**पिंकी** : टिंब.. टिंब . मुळासकट कापून टाका!

**टुणटुण** : भगिनीनो, तुमच्या भावना मी समजू शकते. आपल्याला कापाकापी करायची नाही. नाहीतरी आपल्यावरही तीच आपत्ती येईल. आपल्याला लिंग निर्मूलन करावयाचे नसून लिंग भेदावर उभा असलेला समाज नाहीसा करावयाचा आहे. भगिनीनो, आजचं नाटक आम्ही बंद का केलं..?

**पिंकी** : अजूनही तुम्ही सांगितलं नाही.

**टुणटुण** : तेच तर सांगते आहे. सर्व भाषेतले बहुतेक सर्व पुरुष लेखक, आमचं बसणं, आमचं उठणं, आमचं वाङ्मयुर्क्ष करणं, आमची अक्कल, आमचा विनोद, आमचं कुलशील, आमचं डायटिंग आणि एडिटिंग, आमचं ड्रेसिंग आणि हेअरड्रेसिंग, आमची लफडी आणि कुलंगडं यावरच विशेषत मराठी लेखक नाटकं लिहितात.

**प्रिया** : कोण आहेत ते लेखक?

**टुणटुण** : ऐका! मध्येच बोलू नका.. तर, काही अतिशय धूर्त आणि लबाड लेखक वरवर, स्त्रियांना पतिव्रता वा देवता आहेत असं भासवून, त्यांना

गुलामासारखं वागविण्याचा आणि वागण्याचा आदर्श समाजापुढे ठेवतात.

**सर्व** : शेम ! शेम !

**टुणटुण** : तेव्हा भगिनींनो, नुसता निषेध व्यक्त करून आणि घोषणा देऊन भागणार नाही.

**प्रिया** : कार्यक्रम ठरवा !

**पिंकी** : आम्ही तो अमलात आणू !

**टुणटुण** : ऐका. मध्ये मध्ये बोलू नका. कार्यक्रमच सांगते आहे आपल्या कार्यक्रमाचे एकूण चार भाग आहेत. त्यापैकी पार्ट वन, स्त्रियांवर अन्याय करणाऱ्या लेखकांची नाटके बंद पाडून त्यांना 'वार्वनिगच्या' कोर्टात खेचून शिक्षा ठोठावणे.

**प्रिया** : व्हेरी नाईस !

**टुणटुण** : पार्ट टू, पुरुषांनी लिहिलेल्या ज्या ग्रंथातून स्त्रियांवर मुद्दाम अन्याय केलेले आहेत असे, रामायण महाभारतासारख्या ग्रंथाचे पुनर्लेखन करणे आणि तिसरा आणि महत्त्वाचा पार्ट म्हणजे, पुरुषांजवळचे सर्वतऱ्हेचे संबंध तोडणे.

**सर्व** : वार्वनिग मूव्हमेंटचा विजय असोऽऽ.

**प्रिया** : आणि चौथा पार्ट ?

**टुणटुण** : तो अजूनही लिहायचा आहे. कारण त्यासाठी अधिक अभ्यास व चिंतनाची गरज आहे.

**प्रिया** : ठीक आहे. कोण आहेत हे लेखक ? त्यांना कोर्टात खेचा.

**पिंकी** : व. पु. काळे असतील !

**टुणटुण** : असे काळे-गोरे अनेक आहेत. आपल्या काही नाटकातून स्त्रियांना पतिव्रता देवता वगैरे वगैरे म्हणून गुलामासारखे राबविणारे सर्वात मोठे महाराष्ट्र नाटककार आहेत. राम गणेश गडकरी.

**पिंकी** : त्यांच्यावर नक्की आरोप काय आहे ? उदाहरणादाखल सांगा. अगर दाखवा. प्रत्यक्ष पुराव्याशिवाय कोर्टात जाता येणार नाही.

**प्रिया** : त्यांची ती एकच प्यालातली, दारुड्या सुधारकानं दारू पिऊन लाथेने चिखलासारखी तुडविली तरी, 'पतिदेवची ललनांना' म्हणणारी आदर्श हिंदू पतिव्रता सिंधू......

**पिंकी** : कुठे आहे ? कुठे आहे ती ? दाखवा मला. मी तिलाच तुडविते चिखलासारखी. (काळोख रंगभूमी पुन्हा प्रकाशमान होते तेव्हा मागील लेव्हलवर एकच प्यालयातले दृश्य सुरू होते.)

**सिंधू** : (सुधाकर दारू पितो आहे. त्याचे पाय धरुन) दादा, या पायापासून दूर कुठं जाऊ म्हणतोस ?

**पद्माकर** : या नरकाबाहेर कुठेही !

**सिंधू** : दादा, हा नरक ? अरे, तू चांगला शहाणा ना ? वेड्या, हे पाय जिथे असतील तिथंच माझा स्वर्ग ! त्याला तू नरक म्हणतोस ! (सुधाकर तिच्या डोक्यावर पाय ठेवतो उचवया देतो, बरळतो) तिथेच माझा वैकुंठ आणि तिथेच माझा कैलास !

कशिया त्यजू पदाला। मम सुभग शुभ पदाला. दादा, तुमच्या चौदा चौकड्यांच्या राज्यात राहून, रौरवाची राणी होण्यापेक्षा दुर्दैवाची दासी होऊन दुःखात दिवस काढीन. या पवित्र पायाजवळ अशी आठी प्रहर बसून राहीन (सुधाकराच्या पायावर मस्तक ठेवते. तो तिला लाथ मारून दूर उडवितो) देवा, इकडून मला असं का बरं दूर लोटण झालं !

**प्रिया** : अगं, त्याच्या डोक्यावर तिकडून लाटणं घाल, म्हणजे इकडून दूर लोटणं होणार नाही.

**सिंधू** : काय बोलतेस हे प्रिया ? तुझ्यासारख्या आर्यप्रपतिव्रतेला हे शोभत नाही. (सुधाकरला) वैकुंठेश्वरा, माझ्या अजाण मैत्रिणीला क्षमा करा ! माझ्या कपाळीच्या कुंकवासाठी या पायधूळीत मला रहायला नको का ? देवा, या पवित्र पायापासून या दीन दासीला दूर लोटू नका. आपल्या पवित्र पायाला स्पर्श करून मी शपथ वहाते की यापुढे कुणाच्याही पैशाला मी स्पर्श करणार नाही.

**सत्य वदे वचनाला नाथा**
**स्मरुनि पदाला या सुरविमला**
**वित्तपराजित मानिही विषसम**
**स्पर्शिन ना कधी मी त्याला**

**पद्माकर** : ताई, काय बोलतेस हे ? कोसळणाऱ्या आकाशाला सावरून धर-

णारा, तुझा हा डोंगराएवढा भाऊ असताना तू या दिवाण्या दारूबाजासाठी या सुधाकरासाठी .. ..

**सिंधू** : दादा, पतिव्रतेच्या कानाची ही अमर्यादा आहे ! दादा जा. या जगात माझा बाप, भाऊ कुणीही नाही. पतिव्रतेला नाती नसतात. ती बापाची मुलगी नसते, मुलाची आई नसते, भावाची बहीण नसते. फक्त देवा ब्राह्मणांनी दिलेल्या नवऱ्याची ती बायको असते !

**टुणटुण** : बस बस सिंधू ! कळली तुझी अक्कल ती असते फक्त नवऱ्याची गुलाम. (दृश्य संपते)

**प्रिया** : नवऱ्याची गुलामगिरी मानणाऱ्या गडकऱ्यांच्या सिंधूचा आम्ही धिक्कार करतो !

**पिंकी** : धिक्कार धिक्कार करतो !

**टुणटुण** : काय करू ग, पातिव्रत्याच्या नावाखाली स्त्रियांचं असं पोतेरं करून टाकणारे, ते राम गणेश गडकरी माझ्या हातात सापडले असते, तर मिक्सर मध्ये घालून त्यांची चटकेदार चटणी केली असती.

**पिंकी** : आपल्या कार्यक्रमाप्रमाणे अशा लेखकांना ब्राबर्निंग मूव्हमेंटच्या कोर्टात नेऊन शिक्षा ठोठावू या. आरोपी नं. १ राम गणेश गडकरी.

**टुणटुण** : कशी ठोठावणार ? ते आहेत स्वर्गात.

**प्रिया** . मी त्यांना तुमच्या हातात सापडवून देते.

**टुणटुण** : कसं ?

**प्रिया** : मी त्यांचा आत्मा प्लँचेटवर बोलावते.

**टुणटुण** : एक्सलंट ! त्यांचा आत्मा एकदा भूतलावर आला की, मी माझ्या सिद्धीच्या जोरावर, आत्म्यासहित शरिर आणि शरिरासकट गडकऱ्यांना कोर्टात खेचते.

**पिंकी** : अय्या कसली सिद्धी ?

**टुणटुण** : मी निशाधीशांच्या आश्रमात, पुण्याला एक वर्ष होते. तिथे प्राप्त केली.

**पिंकी** : अय्या, मग तिथे तुम्ही संभोगाकडून समाधीकडे जायला शिकला असाल ना ? आम्हाला शिकवाल का ? मज्जा तरी बघु या.

**टुणटुण** : संभोगाकडून समाधीकडे जाण्याचे अनेक कोर्स आहेत.

**प्रिया** : कोण शिकवतं हे सारे कोर्स ?

**टुणटुण** : स्वत: निशाधीश शिकवतात. दुसऱ्या कोणाला चान्स देत नाहीत. अगं, प्रॅक्टिकली बोलते. धन्य आहे त्या निशाधिशांची ! नग्न स्त्रीला मिठीत घेऊनही त्यांचा संयम सुटत नाही.

**पिंकी** : त्या स्त्रीला समाधी लागल्यावर त्यांचा संयम असेल तर त्या बिचाऱ्या स्त्रीला काय कळणार ?

**प्रिये** : तुम्ही कसला कोर्स घेतलात तिथे ?

**टुणटुण** : मी शुन्याकडून समाधीकडे जाण्याचा प्रॅक्टिकलसह कोर्स घेतला. अगं काय सांगू तुला पिंके, विजेचा शॉक बसतो ना., तसे शॉक बसतात. हाऊ स्वीट ! हळूहळू शुद्ध हरपत जाते. समाधी उतरल्यावरच जमिनीला पाय लागतात.

**पिंकी** : तेव्हा निशाधीश कुठे असतात ?

**टुणटुण** : समाधीकडे नेण्यास त्यांचं काम पूर्ण झालेलं असतं म्हणून ध्यान-धारणासाठी ते दुसऱ्या एअर कंडिशंड दालनात गेलेले असतात !

**पिंकी** : पण, टुणटुण मॅडम, मला हे कळत नाही, हे ब्रह्मचारी निशाधीश संभोगाकडून समाधीकडे जाण्यासाठी शिवांबू प्राशन करुन समसंभोग का घेत नाहीत ? त्यासाठी त्यांना देशीविदेशी सुंदर आणि तरुण स्त्रियाच का लागतात ?

**टुणटुण** : त्यांना एड्स्‌ची भीती वाटत असेल ! आचरटासारखं बोलू नकोस. सिद्धी प्राप्त करुन घेण्यासी मी गेले होते बाकी मला ठाऊक नाही.

**प्रिया** : कच, संजीवनी विद्या प्राप्तीसाठी शुक्राचार्यांच्या आश्रमात राहिला नव्हता का ? तसं असेल होयना हो टुणटुण मॅडम् ?

**टुणटुण** : आता पुरुष निशाधीशांची आपल्याला गरज नाही.

**प्रिया** : महिलांसाठी आपण असला आश्रम चालवू या. तुम्ही निशाधीशाचं काम करा.

**टुणटुण** : ते राहूद्या ग त्या गडकऱ्यांना आधी बोलाव.

**पिंकी** : मी त्यांना कोर्टात खेचते. (कोर्टाची व प्लेंचेटची तयारी सुरू) सायलेन्स ! कोर्ट इज नॉऊ वॉकिंग.

**टुणटुण** : माझ्यासाठी काळा गाऊन हवा. मी जज्ज होणार.

**प्रिया** : शपथेसाठी बायबल आणि गीता हवी.

टुणटुण : गीता असली तरी पुरे. पिंजरा मात्र हवा.

पिंकी : पोपटाचा चालेल ?

प्रिया : आरोपीचा हवा. तयारीला लागा. (टुणटुण जज्ज, प्रिया वकील, पिंकी चोपदार व क्लार्क अशी कामे करतात

पिंकी : शांतताऽऽऽ कोर्ट चालू होत आहे. टण् टण् टण् अकरा वाजले न्यायमूर्ती आपल्या चेंबरमधून कोर्टात यायला निघालेऽऽऽ सायलेन्सऽऽऽ (टुणटुण न्यायाधिशांच्या खूर्चीवर)

टुणटुण : आरोपी कोण आहे ?

प्रिया : थांबा ! आरोपीला प्रथम प्लँचेटवर बोलावते मग तू त्यांना कोर्टात खेच. (प्रकाश बदल. गडकऱ्यांना प्लँचेटवर बोलावते

पिंकी : राम गणेश गडकरी हाजिर होऽऽऽ (तीन वेळा पुकारते) (गडकरी येऊन पिंजऱ्यात उभे राहातात)

टुणटुण . क्लार्क ऑफ दी कोर्ट, आरोपपत्र वाचून दाखवा.

पिंकी : (आरोपपत्र वाचते) राम गणेश गडकरी इंडियन पिनल कोडाच्या अमुक अमुक कलमाप्रमाणे तुम्ही, तुमच्या एकच प्याला या नाटकाच्याद्वारे स्त्रियाना पतिव्रता, देवता असं संबोधून त्यांची विटंबना करून स्त्रिसमाज विघातक कृत्य केलं आहात. असा शिक्षापात्र आरोप तुमच्यावर ठेवण्यात आला आहे. सदील आरोप तुम्हाला मान्य आहे की अमान्य ?

गडकरी पूर्णत: अमान्य आहे.

पिंकी : आरोपीला गुन्हा अमान्य आहे. आपल्यावरील खटला चालवावा अशी त्यांची विनंती आहे. (पिंकी गीता म्हणून एक हजार एक पाकक्रिया हे पुस्तक देते) शपथ घ्या.

गडकरी : (पुस्तकाचे नाव वाचून) एक हजार एक पाकक्रिया—या पुस्तका वर हात ठेऊन शपथ घेतो की . . .

पिंकी : अय्या ! गीतेऐवजी पाकक्रियेचं पुस्तक चुकून दिलं गेलं. आणा ते इकडे

टुणटुण · काही हरकत नाही पाकक्रियेच पुस्तक हे अधुनिक स्त्रीच्या कीचनची गीताच आहे घ्या शपथ, घ्या !

गडकरी : देवा शपथ खरं सांगेन खोटं सांगणार नाही.

टुणटुण : फिर्यादी पक्षाचे वकील कोण आहेत ?

22848

प्रिया : मिलॉर्ड, आवर्निंगच्या वतीनं मी काम पहाणार आहे.

टुणटुण : ओ ! अॅडव्होकेट प्रिया प्रियोळकर ! प्रोसीड.

प्रिया : तुमचं वय ?

गडकरी : शंभर वर्षे (सर्व हसतात)

टुणटुण : ऑर्डर, ऑर्डर. (हातोडा टेबलावर आपटते)

प्रिया : मिलॉर्ड, खरं बोलायची शपथ घेऊनही अरोपी खोटं बोलतो आहे

गडकरी : मी खरं तेच बोलतो आहे. नुकतीच माझी शंभरावी जयंती साजरी झाली. हा माझ्या वयाचा पुरावा आहे.

टुणटुण : तुम्ही एकच प्याला हे नाटक मरणानंतर लिहीलंत की मरणापूर्वी.

गडकरी : मरणापूर्वी.

टुणटुण : मग मरतानाचं वय सांगा.

गडकरी : बत्तीस वर्षे

प्रिया : इतक्या लवकर तुम्ही मरण का पावलात ?

गडकरी : आय ऑबजेक्ट युवर ऑनर–माझी केस मीच चालविणार आहे. तेव्हा हा प्रश्न विषयाशी संबधित नाही.

प्रिया : युवर ऑनर, आरोपी इतक्या लवकर मरण पावला नसता तर त्याने स्त्रीवर्गाची अनेक तऱ्हेने अधिक नाचक्की केली असती. म्हणून आरोपींचं मरण नैसर्गिक होतं की काय हे मला पाहायचं आहे.

टुणटुण : ओऽ आय सी ! ऑब्जेक्शन इज नॉट सस्टेंडेड–प्रोसीड.

प्रिया : बोला, इतक्या लवकर तुम्ही कसे मरण पावलात ?

टुणटुण : जगण्यासारखं जवळ काही असतं तोपर्यंतच मरणात खरी मौज असते ! असं शेक्सपियरनं म्हटलं आहे. (गडकरी हसतात) त्या प्रमाणे जगण्यातली मौज संपल्यामुळे तुम्ही लवकर मरण पावलात काय ?

गडकरी : मरण मला पावलं म्हणून मी लवकर मरण पावलो (हंशा)

टुणटुण : ऑर्डर ! ऑर्डर !

पिंकी : सायलेन्स ऽऽ कोर्ट इज वॉकिंग !

टुणटुण : बाष्कळ कोटया करू नका. हे नाट्यमंदीर नसून न्यायमंदीर आहे. अशी आरोपीला समज देण्यात येत आहे.

प्रिया : म्हणजे तुम्हाला नैसर्गिक मरण अनैसर्गिक वेळेला प्राप्त झालं आहे...

**टुणटुण** : वकील महाशयांनी आरोपीसारख्या अनैसर्गिक कोट्या करू नयेत.
**प्रिया** : आरोपी गडकरी तुम्ही तुमच्या 'एकच प्याला' या नाटकात सिंधू या पात्राला प्रतिव्रता, देवता, असं संबोधिलं आहे की नाही ?
**गडकरी** : होय पातिव्रत्य आणि पावित्र्य हे भारतीय संस्कृतीला पडलेले एक पवित्र आणि सुगंधी स्वप्न आहे. म्हणून पत्रपतिव्रतेप्रमाणे मी सिंधूचं चारित्र्य रेखाटलं आहे.
**प्रिया** : मिलॉर्ड, आरोपी भाषाप्रभू आहे. अदालतीच्या डोळ्यात धूळ फेकण्यासाठी तो शब्दांची पखरण करतो आहे परंतु पातिव्रत्याच्या नावाखाली, स्त्रीला गुलामासारखं वागविण्याचा त्याचा हेतू स्पष्ट आहे. एवढच नव्हे. तर त्याने आपल्या भावबंधन या नाटकात इंदू, बिंदू व वधू परीक्षा या लेखात ठकी, ही पात्रे निर्माण करुन स्त्रीच्या सौंदर्याची पाषाणालाही पाझर फोडणारी क्रूर थट्टा केली आहे. तेव्हा ही दोन पुस्तके पुराव्यात समाविष्ट करावित अशी मी कोर्टाला विनंती करते. (पुस्तके क्लार्कच्या मार्फत न्यायाधिशाना दिली जातात) मिलॉर्ड, आरोपीचा महाभयंकर गुन्हा लक्षात घेऊन पुढील पिढीतील नाटककारांनी त्याचा कित्ता गिरवू नये म्हणून, त्याला जास्तीत जास्त मरणोत्तर शिक्षा द्यावी. दॅट वुईल बी दी ऑल. (बसते)
**टुणटुण** : शिक्षा सांगण्यापूर्वी आरोपीला कांही सांगावयाचे आहे काय ?
**गडकरी** : होय ! न्यायमूर्ती महाराज, स्वार्गात मी मरणाच्या वर्षावात न्हात बसलो आहे. परंतु अमृत प्राशनामुळे मला पुन्हा पुन्हा जीवन प्राप्त होते. तरी मी परत जिवंत होणार नाही अशी मरणाची शिक्षा मला द्यावी. अशी माझी कोर्टाला विनंती आहे.
**टुणटुण** : एकदा तुम्ही मरण पावलात. मग परत मरणाची शिक्षा कशासाठी हवी आहे ?
**गडकरी** : स्वर्गात मरून, मला महाराष्ट्रात पुर्नजन्म घ्यावयाचा आहे
**टुणटुण** . महाराष्ट्रातच कशासाठी ?
**गडकरी** : मराठी भाषेतील माझी संकल्पित सतरा नाटके लिहून पूर्ण करावयाची आहेत
**टुणटुण** : नाही तुमची विनंती कोर्टाला मान्य करता येणार नाही. तेव्हा राम गणेश गडकरी, तुमचं मरतानाचं वय आणि प्रतिभा लक्षात घेऊन

तुम्हाला कमीत कमी शिक्षा देण्यांत येत आहे की.., तुम्ही स्वर्गातच राहून महाराष्ट्रातील हॉट-हीट नाटकातली 'हीट' काढून ती सभ्य प्रेक्षकाना 'थंड' वाटतील अशा तऱ्हेने पुन्हा लिहीण्याची शिक्षा तुम्हाला देण्यात येत आहे. ही शिक्षा तुम्ही मरणोत्तर भोगावयाची आहे. (गडकरी जातात)

**टुणटुण** : आरोपी नं. २ कोण आहे ?

**पिंकी** : गडकऱ्यांचे पट्ट शिष्य आचार्य प्रल्हाद केशव अत्रे

**प्रिया** : बघा हं टुणटुण मॅडम् तुम्ही सांगत असाल तरच मी आचार्य अत्रेना बोलवते. मला बाई त्यांची भीती वाटते भर कोर्टात एकमेकांच्या भानगडी बाहेर काढतील.

**टुणटुण** : बोलाव, बोलाव-गेल्या दहा हजार वर्षात कुणी कुणाला दिली नसेल अशी शिक्षा मी त्याना देते.(प्रिया त्याना प्लँचेटवर बोलावते)

**पिंकी** : आरोपी प्रल्हाद केशव अत्रे हाजिर होऽऽऽ (तीन वेळा पुकारते)

**टुणटुण** : आरोपपत्र वाचून दाखवा.

**पिंकी** : प्रल्हाद केशव अत्रे, तुम्ही तुमच्या काही नाटकातून स्वातंत्र्य आणि स्वतःच्या विकासासाठी स्त्री जेव्हा घराबाहेर पडते तेव्हा पुरुषाच्या आधारा-शिवाय तिला जगताच येत नाही असे दाखवून स्त्रीचं परावलंबित्व व असा ह्याना दाखवून स्त्री वर्गाचा घोर अपमान केला आहात. असा आरोप तुमच्या वर ठेवण्यात आला आहे तुम्ही अपराधी आहात की निरपराधी ?

**अत्रे** : दहा हजार वेळा मी निरपराधी आहे !

**पिंकी** : आरोपीला गुन्हा अमान्य असून आपल्यावरील खटला चालवावा अशी त्याची विनंती आहे (पिंकी गीतेऐवजी दुसरे पुस्तक देते) घ्या शपथ.

**अत्रे** : (पुस्तकाचे नाव वाचून) 'अनंगरंग रतिशास्त्र' या पुस्तकावर हात ठेवून मी, शपथ घेतो की, .

**टुणटुण** : (किंचाळून, पिंके, माझ्या पर्समधे लपवून ठेवलेलं पुस्तक तू का काढलस ? (हिसकावून घेते)

**पिंकी** : सहज म्हणून चाळलं. तर ते बरं वाटलं म्हणून ठेवून घेतलं आणि गीतेऐवजी ते आरोपीच्या हाती गेलं. सॉरी मॅडम !

**अत्रे** : न्यायमूर्ती महाशय, आता कशावर हात ठेऊन मी शपथ घेऊ ?

**टुणटुण** : तुमचा शपथविधी झाला आहे असं समजा-

**अत्रे** : ठीक आहे. न्यायमूर्ती महाशय, हा धादांत खोटा आरोप आमच्यावर कुणी केला आहे, हे आम्हाला कळेल का ?

**प्रिया** : आम्ही, ब्राबनिंग मूव्हमेंटच्या स्त्रियांनी.

**अत्रे** : आधी ब्रा घाला आणि मग आमच्यावर आरोप करा !

**प्रिया** : आम्ही विदाऊट ब्रा बोलत नाही. आमच्या संघटणेचं नाव ' ब्रा बर्निंग मूव्हमेंट असं आहे.

**अत्रे** : मग तुम्ही कुणाच्या ब्रा जाळता ?

**टुणटुण** : ऑर्डर ! ऑर्डर !

**पिंकी** : सायलेन्स ! कोर्ट चालू आहे.

**टुणटुण** : आरोपी आणि वकील या दोघांनाही समज देण्यात येत आहे की, अदालत म्हणजे सवाल-जवाबांचा फड नव्हे. कोर्टाची शिस्त पाळली जावी.

**प्रिया** : आय ॲम सॉरी युवर ऑनर !

**टुणटुण** : **प्रोसिड** ऑन !

**प्रिया** : मिलॉर्ड, आपले गुरु गडकरी यांच्या पावलावर पाऊल ठेऊन, आरोपी अत्रे, यांनी, आपण मोठे स्त्रियांचे कैवारी आहोत असा आव आणून स्त्रीला ब्रह्मचारी पुरुषाचे ' पाणिग्रहण ' करायला लावून तिच्या हातात ' लग्नाची बेडी ' अडकविली आणि 'जग काय म्हणेल ' याची पर्वा न करता स्त्रीला ' घराबाहेर ' घालवून तिच्या ' उद्याच्या संसाराचं ' वाटोळं केलं आहे. उंबरठ्याबाहेर पडलेल्या स्त्रीची शारिरीक, आर्थिक, मानसिक कोंडी करून पुरुषाशिवाय तिला घराबाहेर ' पर्याय ' नाही असे काही नाटकातून प्रतिपादन केले आहे. त्यामुळे स्त्रीचा सर्व तऱ्हेचा विकास संपला आहे आणि स्त्रीची प्रगती थांबविण्याची नाटककारांत परंपरा निर्माण होते आहे. पुरावा म्हणून आपण मुकताच ' एकच प्याला ' तील एक प्रवेश विदाऊट ड्रेस पाहिला आहे. (हशा)

**टुणटुण** : ऑर्डर ! ऑर्डर !

**पिंकी** : सायलेन्स ! कोर्ट इज वॉकिंग !

**टुणटुण** : ॲडव्होकेट मिस् प्रिया प्रियोळकर, आम्ही विदाऊट ड्रेस नाट्यप्रवेश पाहिला ? आपण शुद्धीवर अहोत काय ?

**प्रिया** : आय बेग युवर पार्डन ! मिलॉर्ड आय मिन टू से आपण सिव्हिल

ड्रेसमध्ये होतात म्हणजे न्यायाधिशाच्या ड्रेसमध्ये नव्हतात.

**टुणटुण** : ओऽआय सी ! यू मिन टू से विदाऊट युनिफॉर्म अँड नॉट विदाऊट ड्रेस.

**प्रिया** : आरोपी अत्रे, तुम्ही स्त्रीद्रोही आहात की नाही ?

**अत्रे** : मुळीच नाही. माझ्या अनेक नाटकातून स्त्रीला स्वातंत्र्य मिळावं म्हणून काया-वाचा-मने प्रयत्न केले आहेत.

**प्रिया** : तुमच्या सकट सर्व पुरुष कायेनेच स्त्रीचा उद्धार करतात-मिलॉर्ड आरोपीचा गंभीर गुन्हा लक्षात घेऊन त्याला जास्तीत जास्त शिक्षा द्यावी अशी माझी कोर्टाला विनंती आहे. (बसते)

**टुणटुण** : आरोपीला काही सांगायचे आहे ?

**अत्रे** : होय. महामूर्ख स्त्रियांनो ! तुमच्यासारख्या महामूर्ख स्त्रीया गेल्या दहा हजार वर्षात झाल्या नाहीत.

**टुणटुण** : ऑर्डर ! ऑर्डर ! (हातोडा आपटते. गोंधळ)

**पिंकी** : सायलेन्स ! कोर्ट चालू आहे !

**अत्रे** : वकीलसाहेब मघापासून पहातो आहे. कोर्ट चालू आहे ! कोर्ट चालू आहे ! असं पुन्हा का सांगण्यात येत आहे. ज्याअर्थी कोर्टाच्या पर्समध्ये 'अनंगरंग रतिशास्त्राचं' पुस्तक सापडलं. त्याअर्थी कोर्ट चालू आहे. ही गोष्ट सहज समजण्यासारखी आहे.

**टुणटुण** : आरोपीला समज देण्यात येत आहे की, ही कोर्टाची बेअदबी आहे या गुन्ह्याबद्दल आरोपीवर स्वतंत्र खटला भरण्यात येईल.

**अत्रे** : कोर्ट अदबीने वागलं असतं तर आम्हाला बेअदबी करण्याचं काहीच कारण नव्हतं. कोर्टाने कृपाकरून ध्यानात घ्यावं की, मी पत्रकार आहे. प्रत्येकाचे स्पुटनिक छायाचित्रासह माझ्या टेबलाच्या खणात आहेत.

**टुणटुण** : आता या चालू खटल्याचा निकाल मी जाहीर करीत आहे. आपल्या नाटकातून स्त्री वर्गाचा अपमान आणि त्यांची प्रगती खुंटविण्याचा प्रयत्न केल्याबद्दल आरोपीला पुढील दहा हजार वर्षे नाटके लिहिण्याची मनाई करण्यात येत आहे. आरोपीने ही शिक्षा मरणोत्तर भोगावयाची आहे. (अत्रे हसत जातात.)

**प्रिया** : म्हातारी मेल्याचं दुःख नाही. पण यांच्या पावलावर पाऊल ठेवून

बाळ कोल्हटकर, वसंत कानेटकर, जयवंत दळवी आणि दुसरे परचुटण लेखक अशीच नाटके लिहू लागले आहेत.

**पिंकी :** या सर्वांना कोर्टात खेचा.

**टुणटुण :** ते अजून जिवंत आहेत. नंतर पाहू.

**प्रिया :** पण मी गप्प बसणार तुम्ही मला शस्त्रे द्या. मी, तुम्हाला स्वातंत्र्य देईन.

**द्या मज कुणीतरी शस्त्र दुधारी**
**उचलीन मी ते प्राणपणाने**
**तोडुनी टाकीन नाट्यवृक्षाच्या**
**जीर्ण-शीर्ण फांद्या**
**ज्या फांदीवर बसले होते,**
**राम गडकरी, प्रल्हाद अत्रे,**
**बाळ कोल्हटकर, कानिटकर, दळवी,**
**लुंगेसुंगे आणिक दुसरे फडतुस नाटककार,**
**धिक्कार असो, धिक्कार असो या मेल्या पुरुषांचा**

**टुणटुण :** सेक्स मशीन समजतात आम्हाला. 'वखवखलेले', 'आज धंदा बंद आहे', 'सेक्स बॉम्ब', 'घाशिराम ड्रायव्हर' यासारखी नाटके लिहून आमच्यावर वाङ्मयीन बलात्कार करतात !

**पिंकी :** मी म्हणते, बलत्काराला आपण परवानगीच दिली नाही तर ? (हशा)

**टुणटुण :** पिंकी, तू अजून अजाण आहेस.

**प्रिया :** हा परंपरेचा इतिहास बदलला पाहिजे. संशोधन केलं पाहिजे.

**टुणटुण :** अगं, आता तरी इतिहास वाचा. मागचं मला ठाऊक नाही. पण पेशवाईपासून पहाते आहे. दुसऱ्या बाजीरावाने आणि नाना फडणीसाने प्रत्येकी सहा-सहा लग्ने केली. बाजीरावाची पहिली पत्नी भागिरथीबाई वयात यायच्या आतच तिला तो त्रास द्यायचा.

**प्रिया :** अय्या ! असं काहीतरीच बोलू नका. नाहीतर पुणेकर मंडळी हे नाटक इंग्लंडला जाऊ देणार नाहीत.

**टुणटुण :** काही तरी बोलत नाही. मी इतिहास सांगते आहे. पेशवे दप्तर माझ्या काखेत आहे. पुराव्याशिवाय मी बोलत नाही. नाना फडणीस मेला तेव्हा त्याच्या स्कॉकमधल्या काही बायका वयातही आल्या नव्हत्या

**पिंकी :** बाजीरावाचा पराक्रम आणि नानाच्या शहाणपणाची परंपरा कुणी चालू ठेवीत नाही !

**टुणटुण :** परंपरा चालू ठेवतात. त्या बायका ठेवण्याच्या. तो मेला 'सखाराम' 'बाईंडर' असूनही त्याने सहा बायका ठेवल्या !

**पिंकी :** प्रत्येकी सहा बायका ठेवण्याचा सरकारी कोटा आहे का हो ?

**प्रिया :** पण त्यामुळे प्रत्येक बायकोच्या वाटयाला एकषष्ठांश नवराच येतो. त्याने काय होणार आहे ?

**टुणटुण :** ..हे मेले सखाराम पोलिसात भरती होण्याऐवजी सोडलेल्या बायकांची वाट पहात असतात एस् टी. स्टँडवर किंवा रेल्वेस्टेशनवर !

**प्रिया :** म्हणून म्हणते हा इतिहास बदलला पाहिजे.

**पिंकी :** यावर उपाय म्हणून पुरुषानांच स्त्रियांनी ठेवून घेतलं तर ?

**टुणटुण :** (तिच्याकडे लक्ष न देता) याला कारण एकच 'स्त्री स्वातंत्र्यं न अर्हती !' माजघरातून आम्हाला अंगणात आले पाहिजे.

**प्रिया :** अंगणातून आंगणाकडे वाटचाल करायला हवी !

> **'आम्ही मनापासून द्वेष करतो–**
> **या माजघरातील बंदिवान जीवनाचा**
> **गुलामगिरीची वाट संपण्याची,**
> **खूप दिवस वाट पाहिली**
> **उठा स्त्रियांनो, उठा मैत्रिणींनो,**
> **उचला त्या बंदुका पुरुषशाही उलथून पाडण्यासाठी.'**

**टुणटुण :** आपला कार्यक्रम ठरवून, कार्यकर्त्या तयार करण्यासाठी आचार संहिता तयार करायला हवी.

**प्रिया :** आचार संहिता नको. आम्हाला हवी 'प्रतिज्ञा'

**पिंकी :** प्रतिज्ञा ? प्रतिज्ञा मला येते. म्हणू ? भारत माझा देश आहे सारे-भारतीय माझे बांधव आहेत. माझ्या देशावर माझं प्रेम आहे. वगैरे वगैरे वगैरे !

टुणटुण : ही प्रतिज्ञा स्त्रीद्रोही आहे. त्यात सारे भारतीय माझे बांधव आहेत असं म्हटलं आहे. भगिनींना त्यातून वगळलं आहे.

प्रिया : ही प्रतिज्ञा कुणा पुरुषानेच लिहिली असेल. आपल्यासाठी मी नवी प्रतिज्ञा लिहिली आहे. (प्रिया एकेक ओळ सांगते बाकीच्या तसे म्हणतात)

### प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे.
सर्व स्त्रिया माझ्या भगिनी आहेत.
मातृत्व हे पुरुषाचे कर्तृत्व आसल्यामुळे
' निरोधला ' मी विरोध करणार नाही.
विधवा, परित्यक्ता, घटस्फोटिता आणि कुमारिका
यांना ' निरोध ' वापरण्याचे हक्क मी बिनविरोध मिळवीन.
कुमारिकेपासून विधवेपर्यंत सर्वांना बाळंतपणाची
रजा मिळेल असा मी प्रयत्न करीन
हरतालिका, मंगळागौर, वटपौर्णिमा
ही व्रते मी करणार नाही.
पातिव्रत्य, योनिशुचिता, सेवाभाव.. ,
वगैरे वगैरे गुणांचा मी धिक्कार करते.
या गुणांतून मुक्ती म्हणजेच स्त्रीची खरी मुक्ती आहे.
हे बुरसटलेले गुण आणि परंपरा झुगारुन देण्याची,
पात्रता माझ्या अंगात यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.
मी माझ्या नवऱ्याचा, सासू-सासऱ्यांचा
आणि दीर-नणंदांचा वरचढपणा चालू देणार नाही.
कुंकू, बांगड्या आणि मंगळसूत्र,
ही शृंगाराची आणि पुरुषशरणतेची साधने
मी वापरणार नाही.
स्त्रियांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी

यातच माझे कल्याण सामावले आहे.
स्त्रियांची मुक्ती आणि उन्नती
करण्याची मी प्रतिज्ञा करते.

२२४६४ . २२।४।८९

**पिंकी** : मिस् टुणटुण मॅडम या प्रतिज्ञेप्रमाणे आपण मंगळसूत्र वगैरे सौभाग्यालंकार वापराचे नाहीत ?

**टुणटुण** : नाहीत.

**पिंकी** : अय्या ! मला वाटल, शाळेत म्हणतात तशी फक्त म्हणायचीच असते ही प्रतिज्ञा ! मलातर बाई मंगळसूत्र कित्ती, कित्ती आवडतं ! काळे काळे मणी मधे एवढसं डोरलं गोऱ्या अंगाला कित्ती शोभून दिसतं ! नाव तरी कित्ती छान ! मंगलम् सूत्रम्–मंगलसूत्र !

**टुणटुण** : मंगल नव्हे ! अमंगल सूत्र आहे ते ! स्त्रीच्या गळ्याला लागलेला तो, परवशतेचा पाश आहे.

**पिंकी** : परवशता पाश दैवे ज्यांच्या गळा लागला
असुनि खास मालक घरचा म्हणती चोर त्याला.

**प्रिया** : पिंकी ! हे कॉलेजचं कॉफी हाऊस नव्हे. वात्रटपणा करू नको. वात्रट मेली !

**पिंकी** : मी, अशी प्रतिज्ञा करते की, आता वात्रटपणा करणार नाही पण मॅडम्. सिरियसली विचारते या प्रतिज्ञेतले बरेच शब्द माझ्या डोक्यावरून गेले. 'योनिशुचिता' म्हणजे कसली शुचिता ? 'शुचिता' म्हणजे पावित्र्य एवढं मला ठाऊक आहे.

**टुणटुण** : तो शब्द संस्कृत आहे.

**पिंकी** : मग मराठीत सांगा.

**टुणटुण** : अगं अडचणीचे काही शब्द संस्कृत किंवा इंग्रजीत सांगितले तर, त्यातली अश्लीलता कमी होते.

**पिंकी** : म्हणजे चावटपणा ना ? पण प्रतिज्ञेत चावटपणा कशाला ..?

**टुणटुण** : अगं कसं सांगू तुला ? या शब्दाचा अर्थ जर तुकारामांच्या रांगड्या भाषेत सांगितला तर, त्यात जी काय शुचिता असेल तीही नाहीशी होईल.

पिंकी : पण प्रतिज्ञेचा अर्थ कळला नाही तर ती कशी पाळता येईल आम्हाला ?

**एक निष्ठ सेवक बनलो यात मोक्षसारा**
**पहा तुझ्या मागे येतो चाल तू पुढारा**

म्हणजे तुम्ही ' पुढारा ' चालायचं आणि अर्थ न कळता आम्ही ' माघारा ' चालायचं याला काय अर्थ आहे ?

**टुणटुण** : (कसं समजावावं या पंचायतीत) अगं, स्त्रीच्या काही अवयवांचा, स्त्रीच्या शीलाशी संबंध आहे. त्याची शुचिता.

**पिंकी** : (लक्षात येऊन लाजते) अय्या ! आत्ता आलं लक्षात ! म्हणजे डेलिकेट पार्ट ऑफ दी बॉडी ऑफ ए वुमन आणि त्याची शुचिता म्हणजे होलीनेस म्हणजेच योनीशुचिता !

**टुणटुण** : करेक्ट.

**पिंकी** : हात्तिच्या झोपडपट्टीतल्या सार्वजनिक नळावर यातला मूळ शब्द मी अनेक वेळा ऐकलाय. सांगू ?

**टुणटुण** . नको, नको, नको ! तर काय सांगत होते .. मंगलसूत्रामुळे, बायकांबायकामधे जाती निर्माण होतात. म्हणून पुरुषांजवळचे सर्व संबंध आपल्याला तोडायचे आहेत. मंगलसूत्रामुळेच अनेक नाती जोडली जातात. म्हणून प्रत्येकीने प्रतिज्ञा घेतली पाहिजे.

**प्रिया** : हा वसा आहे उतू नकोस मातू नकोस घेतला वसा टाकू नकोस.

**पिंकी** : टुणटुण मॅडम या क्षणाला तरी तुमचं मत मला पटू घातलं आहे. म्हणून आपली संघटना मजबूत करण्यासाठी म्हणून, मी.. , पिंकी पिपूटकर भीष्म प्रतिज्ञा करते की . , जळ्ळ मेलं मुसळ केरात ! भीष्म म्हणजे पुरुष आलाच ! पुरुषाशिवाय निभणं कठीणच दिसतं.

**टुणटुण** : जमलंच पाहिजे. शपथ घे ! शपथ घे !

**प्रिया** : शपथ वहा ! शपथ वहा !

**पिंकी** : त्रस्त समंधानो शांत व्हा ! आणि माझं म्हणणं ध्यानात घ्या.

**टुणटुण** : काय म्हणणं आहे तुझं ?

**पिंकी** : आपण बायका, बायका असतोना, तेव्हा मला मी, स्त्री असल्याची

जाणीव होत नाही. पण ,पण , एखादा बलदंड राजबिंडा, कुत्रीच्या लहान पिल्लासारखा गोजिरवाणा गुटगुटीत पुरुष दिसलाना, की, पुरुष... दिसलानाऽऽ . दिसलाना–

**प्रिया** : अगं तुझी रेकॉर्ड फिरत का नाही ? चरा गेला आहे काय ? मी सरकवते. (टपली मारते)

**पिंकी** : . राजबिंडा पुरुष दिसलाना, की, कससंच होतं (लाजते) आणि मग मला, मी स्त्री, असल्याची जाणीव होते. तुम्ही काहीही म्हणा, पुरुष म्हणजे देव च्या बागेतलं इव्हने खाल्लेलं ' ज्ञानवृक्षा ' चं फळ आहे. (आपलं सर्व अंग झाकून घेत लाजते)

**टुणटुण** : अशा तऱ्हेने कससंच होऊ नये म्हणूनच पुरुषांचा सर्वतऱ्हेचा संबंध तोडायचा आहे. घे प्रतिज्ञा घे !

**प्रिया** : प्रतिज्ञा घे ! प्रतिज्ञा घे, घे प्रतिज्ञा !

**पिंकी** : मी .., मी .., पिंकी पिपुटकर प्रतिज्ञा घेते की, संघटनेच्या कामासाठी, मी अजन्म ब्रह्मचारी राहीन.

**सर्वजणी** : ब्रह्मचारी ?

**पिंकी** : हो, म्हणजे अविवाहित राहीन आणि ब्रह्मचारी पुरुषाप्रमाणे लग्न न करता सर्व काही करीन. (भराभर बोलते) मगळसूत्र घालणार नाही, बांगड्या वापरणार नाही. कुंकू लावणार नाही वगैरे, वगैरे, वगैरे करणार नाही.

**प्रिया** . सर्व काही करीन म्हणजे ग काय ? पुरुषांशी कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवायचा नाही. प्रतिज्ञा तोंड पाठ करून टाक.

**पिंकी** : मॅडम ही प्रतिज्ञा मला सदोष वाटते. दुसऱ्यानी झोडून काढण्या-अगोदर आपण आपल्या प्रतिज्ञेवर चर्चा करु या. रेडी ?

**टुणटुण** : एस्. रेडी.

**पिंकी** : जर पुरुषांशी संबंध ठेवायचा नसेल, तर तुम्हाला निरोध कशासाठी हवा ? कुमारिका, विधवा, परित्यक्ता यांना बाळंतपणाची रजा कशासाठी हवी ? गर्भपाताला बंदी का नको ?

**टुणटुण** : पुरुषांवर सूड उगविण्यासाठी आम्हाला हे, घटनात्मक हक्क हवे आहेत. त्याचा वापर आम्ही करूच असं नाही.

**प्रिया :** पिस्तूलाचा परवाना असला म्हणजे गोळी घातलीच पाहिजे असं कुठं आहे ?

**पिंकी :** पण, घातलेली गोळी लागली तर ' निरोध ' मात्र हवा ! (रड-कुंडीला येत) पण मला हे जमणार नाही. प्लीज प्रतिज्ञा सुटली म्हणा ना !

**टुणटुण :** का जमणार नाही जमलंच पाहिजे !

**पिंकी :** वयात येणाऱ्या मुलीला वयात येताना काय वाटतं ते तुमच्यासारख्या वयातून गेलेल्या बाईला कळणार नाही ! सगळं भोगून झाल्यावर दुसऱ्यावर बंधनं घालायला तुमच्यासारख्या समाज सुधारिकांचं काय जाते ? वयात येणाऱ्या मुलीला काय वाटतं याचा विचार करा.

**टुणटुण :** अहा, हा ! जसा काही आम्ही कधी वयात आलोच नाही ! काय वाटतं, ते ऐकू दे तरी एकदा.

**पिंकी :** (भावना विवश तरीही मिस्कील) कळीचं रुपांतर फुलात होताना कणाकणानं, क्षणाक्षणाला पाकळ्या उलगडत जातात. तस वयात येणाऱ्या मुलीचं मन उमलायला लागलं की, शरिराचा प्रत्येक अवयव बंधनांना न जुमानता आकार घेऊ लागतो. अंगाची लांबीरुंदी वाढते. घुसळणारं अंग आपो-आप वलयांकित व्हायला लागतं, खड्डे, उंचवटे दिसायला लागतात. रवीनं घुसळल्यासारखं मन घुसळायला लागतं. तिचं हे उमलणं पूर्ण विकसित होण्यासाठी, तिला हवा असतो प्रियकर; ज्याला तुम्ही म्हणता पुरुष !

**टुणटुण :** पुरुषाशिवाय कसं जगावं याचं संशोधन आमचा संशोधन विभाग शोध घेतो आहे.

**प्रिया :** आधी पुरती वयात तर ये, मग बघता येईल ! तुम्ही काहीही शोधा ! पण स्त्री म्हणजे सूर्यफुल आहे तिचा चेहरा नेहमी पुरुषसूर्याकडेच वळणार !

**टुणटुण :** हत्‌ आहे तरी काय तुला ते तर कळू दे !

**पिंकी :** ताकाला जाऊन पडवा लपविण्यासारखे तुम्ही करता आहात.

**डॉ लोपामुद्रा :** (प्रवेशून) काहीही लपवण्याचं कारण नाही. आता पुरुषा-वाचून आमचं खेटरही अडणार नाही.

**टुणटुण :** या, या. डॉ. लोपामुद्रा. (वेशभूषा–पँट, शर्ट, किंवा तत्सम. वय ३०/३५) मैत्रिणींनो, या आहेत डॉ. लोपामुद्रा. एम्. ए पी. एच्. डी.

फ्राईडपासून अनंगरंग रतिशास्त्रापर्यंतचा यांनी प्रॅक्टीकलसह अभ्यास केला आहे या आमच्या संशोधन केंद्राच्या प्रमुख आहेत.

**लोपामुद्रा** : फ्रेंड्स् ! आज मी आपल्याला ब्रो बर्निंग मूव्हमेंटतर्फे महत्त्वाची घोषणा करणार आहे.

**सर्वजणी** : लाँग लीव्ह दी मुव्हमेंट !

**लोपामुद्रा** : ज्या कारणासाठी पुरुष आपली अडवणूक आणि छळणूक करतात त्या रतिक्रिडेसाठी यापुढे आपल्याला पुरुषावर अवलंबून राहाण्याचं कारण नाही.

**पिंकी** : हे कारण कोण नाहीसं करणार आहे ?

**लोपामुद्रा** : आपणच. कारण समलिंगी संभोग नैसर्गिक आहे. (टाळ्या) उलट, मी, डॉ. लोपामुद्रा प्रॅक्टिकली सांगते की, स्त्री पुरुष संबंध अनैसर्गिक आहे. (एकमेकींना मिठ्या मारतात)

**टुणटुण** : डॉ. लोपामुद्रा तुम्ही पुरुषांचा संबंध तोडण्याचा तोडगा अगदी बिनतोड काढलात.

**सर्वजणी** : थ्री चिअर्स टू डॉ. लोपामुद्रा !

**पिंकी** : अजूनही विचार करा. ज्यांना संसार करायचा आहे त्यांना तडजोड ही करावीच लागते. कुणीतरी पड खाल्याशिवाय संसाराची तड कशी लागणार ?

**सर्वजणी** : आम्ही मुळीच पड खाणार नाही !

**लोपामुद्रा** : प्रत्येक वेळी स्त्रीयांनीच पड का खायची ? संसार दोघांचा असतो ना ? बेडरुममध्ये तरी आम्हाला समानता आहे का ? मैत्रिणीनो; प्रॅक्टिकली बोलते, तिथेही आम्हालाच पड खावी लागते.

**टुणटुण** : जोपर्यंत स्त्री स्वतःची लैंगिक इच्छा मुक्तपणाने प्रदर्शीत करीत नाही, तोपर्यंत पातिव्रत्याच्या नावाखाली स्त्रीचं व्यक्तिमत्व आक्रसून जाईल.

**पिंकी** : उदाहरणार्थ, आमच्या मिस् टुणटुण ढमढरेंचं व्यक्तिमत्व कसं चौबाजूनी विकसित झालं आहे पाहा !

**टुणटुण** : तू पुन्हा पुन्हा वात्रटपणा करू नकोस, नाहीतर तुला संघटनेतून काढून टाकू.

**पिंकी** : पुढचं पाऊल टाकण्यापूर्वी ते कुठं पडतं आहे याचा विचार करायला नको का ?

**टुणटुण** : ते वेगळ्या वाटेवरच पडेल याची आम्हाला खात्री आहे.

**पिंकी** : मला वाटतं, वैवाहिक जीवन म्हणजे तुम्ही, केवळं लैंगिक सुख मानता. बेडरुममधे दोन स्त्रियांनी एकत्र झोपून स्त्रीला मातृत्व प्राप्त होत नाही. हे मीलन समाधानी असलं तरी फलदायी ठरत नाही असलं शरीर-सुख रस्त्यावरची कुत्रीही मिळवते.

**टुणटुण** : मग, मघापासून गळा काढून रडते आहेस ती, कसल्या सुखासाठी ?

**पिंकी** : केवळ त्या सुखासाठी नाही. मातृत्व हे स्त्रीच्या महन्मंगल जीवनाचं स्वप्न आहे. त्याचं काय ?

**लोपामुद्रा** : तुला आई व्हायचं आहे, एवढंच ना ? आजच जे. जे. हॉस्पिटल-मधे जाऊन डॉ. इंदिरा आहुजाना भेटते. विदाऊट मॅरेज मदर होता येईल.

**सर्वजणी** : विदाऊट मॅरेज ?

**लोपामुद्रा** : येस् ! विदाऊट मॅरेज. मॅरेजलेस चाइल्ड ! टेस्ट टयूब बेबी.

**प्रिया** : हाऊ वंडरफुल ! नलिका बालक.

**लोपामुद्रा** : टेस्ट टयुब बेबी हे स्त्रीमुक्तीच्या वाटेवरचं पुढचं पाऊल आहे. रतिक्रीडेशिवाय वीर्य पेढीतून वीर्य घेऊन कृत्रिम गर्भधारणा करता येते.

**सर्वजणी** : स्त्री चिअर्स टू टेस्ट टयूब बेबी.

**प्रिया** : बाळा होऊ कशी उतराई
झाले पतिविना मी आई.

**सर्व** . बाळा जोजो रे पिंकी भूषणा, नलीका नंदना, बाळा जोजो रे.

**लोपामुद्रा** : नका ग करू तिची चेष्टा ! अजून अल्लड आहे ती !

**प्रिया** . अल्लड नाही, चांगलीच अलर्ट आहे होय किनाई पिंकुलेराणी गुलुगुलु. (तिला गुदगुदल्या करते)

**पिंकी** : आता चावटपणा तू करते आहेस ! पण मला सांगा, ते वीर्य अखेरीस पुरुषाचंच असणार आहे ना ?

**लोपामुद्रा** : अर्थात !

**पिंकी** : म्हणजे तुम्हाला पुरुषाचं बंधन नको. मातृत्व मात्र हवं पण लोणी हवं असणाराना दूध नाकारता येत नाही.

**लोपामुद्रा** : आमचा विरोध पुरुषाच्या पौरुषाला नसून त्याच्या नवरेपणाला आहे !

**टुणटुण** : पुरुषी स्वामित्व भावनेचा वासनाकेंद्रित अभिमान आणि अहंकारी स्वामित्व आम्हाला मान्य नाही.

**पिंकी** : तरीही, अशा तऱ्हेने पुरुषांना तुम्ही जर दूर लोटलंत, तर, बळाच्या जोरावर वाट्टेल तेव्हा आणि तिथे बलात्कार करून तुमची अब्रू लुटल्याशिवाय ते राहणार नाहीत.

**लोपामुद्रा** : आमची अब्रू आमच्या मनात आहे. ती अशी बलात्कारानं कुणालाही लुटता येत नाही. योनिशुचितेचं आणि अब्रूचं अवास्तव महत्व आम्ही मानतो. म्हणूनच पुरुषाला ती लुटून घेण्याचा आसुरी आनंद वाटतो.

**टुणटुण** : या करिताच शील वा योनिशुचिता हे व्यक्तिमत्वाचं भूषण आहे असं आम्ही मानीत नाही.

**प्रिया** : शीलं परं भूषणम् हे सुभाषीतही वासनेने वखवखलेल्या एखाद्या पुरुषानंच लिहिलं असलं पाहिजे.

**पिंकी** : मग स्त्रियांनी लग्नच करायचं नाही का ?

**टुणटुण** : असं कोण म्हणालं ?

**पिंकी** : मग या सगळ्याचा अर्थ काय होतो ?

**टुणटुण** : तेच तर सांगायचं आहे. पण तुला धीर कुठे आहे ?

**प्रिया** : आपल्या कार्यक्रमाचा पार्ट फोर, चॅप्टर वन सांगा तिला.

**टुणटुण** : अखेरचा उपाय म्हणून ज्याना लग्नं करायची असतील. त्यांनी ती करायला हरकत नाही. मात्र वरपरीक्षेच्या वेळी पुरुषांना अनंत अटी घालून त्यानी त्या मान्य केल्या तरच लग्न करावं नाहीतर आम्ही आडकाठी करू.

**पिंकी** : काय आहेत त्या अटी ?

**टुणटुण** : पार्ट–फोर चॅप्टर टूमधे त्या सांगितल्या जातील. (सूत्रधार व बाळ प्रवेश करतात) आं.. तुम्ही परत का आलात ?

**सर्व** : तुम्हाला नाटक करता येणार नाही.

**सूत्रधार** : कोर्टाचा निकाल लागेपर्यंत काही तडजोड करता आली तर पाहावं म्हणून परत आलो.

**लोपा.** : आम्ही मुळीच माघार घेणार नाही.

**बाळ** : म्हणणं तरी ऐकून घ्याल !

**सूत्रधार** : साम, दाम, दंड, भेद या चाणक्य नीतीप्रमाणे दाम म्हणजे दागीने देऊन, दंड म्हणजे बदडून आणि भेद म्हणजे, भुलवून तुम्ही स्त्रिया आता ऐकणार नाही हे आमच्या लक्षात आलं आहे.

**सूत्र.** : चाणक्य एवढा हुशार पण, साम, दाम, दंड, भेद–यामधे काम घालायला विसरला म्हणून सर्वोदय पद्धतीनं हृदय परिवर्तन करायला आलो आहोत. अहो, तुमची ती प्रतिज्ञा ऐकून आमचे हे सूत्रधार तिबूनाना तर साने गुरुजींसारखे ओक्साबोक्सी रडू लागले. झोपेच्या गोळ्या घेऊन आत्महत्या करतो म्हणाले. म्हणून त्यांना अंत्यदर्शनासाठी आणि जमलंच तर अंतिम तडजोडींसाठी घेऊन आलो आहे

**प्रिया** : अगं, हे बोके लोण्याचा गोळा घेऊन आलेले दिसतात. पण, आम्ही तशा फसणार नाही.

**सूत्रधार** : (भाषण केल्याप्रमाणे) माझ्या प्रिय भारतातल्या प्रिय भगिनीनोऽ ऽ ऽ

**स्त्री** : ओऽ ऽ ऽ

**सूत्र.** : आम्ही आमच्या देशातील स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने वागवीत नाही ही गोष्ट खरी आहे..... ,

**स्त्रिया** : शेम ! शेम ! हेच आमचं म्हणणं आहे.

**सूत्र.** : ....., पण आम्ही त्यांना पुरुषापेक्षा अधिक सन्मानाने वागवितो.

**सर्व** : साफ खोटं.

**सूत्र** : ... .., असं स्वामी विवेकानंद म्हणाले होते नेतृत्वात बदल झाल्यामुळे थोडा धोरणात्मक बदल झाला आहे हे खरं. पण तुम्ही म्हणता तसे सर्वच पुरुष काही वाईट नाहीत. आगरकर, फुले, कर्वे विधवाकुमारीवाले मामा वरेरकर यांच्या कार्याचा इतिहास न पाहाता; इतिहास बदलण्यासाठी तुम्ही सर्वच पुरुषांवर बहिष्कार घालता हे योग्य नव्हे.

**बाळ** : सांप्रतकाली सर्व धर्म समभावाप्रमाणे सर्व स्त्री–पुरुषांमधे समभाव निर्माण व्हावा असा आमचा मानस आहे.

**टुणटुण** : आमचा तुमच्यावर विश्वास नाही.

**सूत्रधार** : तुमचा विश्वास बसावा म्हणूनच आम्ही कार्यक्रम तयार करून

तो कार्यान्वित करायला सुरूवात केली आहे. उदाहरणार्थ, आजवर नग्न स्त्रियांची जशी धिंड काढण्यात येत होती. त्याच पद्धतीने आंध्र प्रदेशातील पुरुष पोलिसांनी नग्न पुरुषांची धिंड काढून समभाव साधण्याचा प्रयत्न केला आहे.

**पिंकी** : शीऽ हा कसला कार्यक्रम आणि समभाव ! निर्लज्ज मेले.

**बाळ** : त्याचप्रमाणे जोगतिणीची लग्नं राजमान्य अशा राजभवनात लावून त्यांची हनिमूनचीही व्यवस्था तिथेच केली होती. आता तरी तुमचा विश्वास बसेल ?

**टुणटुण** : मुळीच नाही. श्रीवर्धन–ई–पेशवे बॅरिस्टर अतुले, करंदीकर यांनी सर्व धर्म समभाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला त्याचं काय झालं ?

**प्रिया** : धर्माधर्मातले भेद मात्र सिमेंट काँक्रिटसारखे घट्ट झाले आणि सिमेंट मात्र महाग झालं.

**लोपामुद्रा** : हे पहा, अशा उखाळ्यापाखाळ्यांनी, तुमच्या आमच्यातले मतभेद वाढत जातील.

**बाळ** : तुम्हाला नसली तरी आम्हाला तुमची गरज आहे.

**टुणटुण** : तुम्ही आम्हाला जसं सर्व प्रकारचं स्वातंत्र्य नाकारलंत तसं आम्हीही नाकारीत आहोत.

**सर्वजगी** : भारतीय नारी फुल नही चिनगारी ! चिनगारी ! आलेत तसे परत जा. वाटाघाटी फिसकटल्या आहेत.

**टुणटुण** : आलेत तसे परत जा !

**बाळ** : मग आता, माता, भगिनी आणि साजणी म्हणून आमचं रक्षण कोण करील ?

**लोपा.** : तुम्हाला कसलेही स्वातंत्र्य मिळणार नाही.

**बाळ** : मग आमचं कसं होईल.

**लोपा.** :

**नलिका रक्षती कौमार्ये**
**समाज रक्षती यौवने**
**वृद्धाश्रमः रक्षती वार्धक्ये**
**पुरुषः स्वातंत्र्यम् नअर्हती**

(शेवटच्या ओळीचे प्रतिध्वनी ऐकू येत असताना पडदा पडतो.)

# अंक दुसरा

(पहिल्या अंकातील नांदीच्याच पूर्वीप्रमाणेच दोनतीन ओळी म्हणतात)

**सूत्रधार** : प्रेमपुरस्कार ईश्वराचे स्तवन इतके झाले तरी पुरे! कारण रसिकजनांना ठाऊक आहे की, पूर्वी अर्धवट राहिलेल्या प्रयोगाच्या वेळी अर्धे ईशस्तवन झालेले आहे. आता प्रयोगाप्रमाणे प्रियेचे अनुमोदन घेऊन नाटकास प्रारंभ करावा म्हटलं तर प्रिया केव्हाच पसार झाली आहे. इतकंच नव्हे तर वळाचा वापर करुन दंडेलीने नाटक बंद पाडणाऱ्या 'ब्राबर्निग'ची ती कार्यकर्ती आहे. कटकट गेली ती एका अर्थी बरं झालं. नाही तर तिनं एखादी साकी किंवा दिंडी म्हणून प्रयोगाला विलंब केला असता. तसा विलंब झाला आहे हे खरं. परंतु मुलगा झाला हो! या नाटकाची केस न्यायप्रविष्ठ असल्यामुळे आमचा नाइलाज झाला. परंतु रसिक मित्रहो— न्यायमुर्तींनी आम्हाला कसलीही काटछाट न करता प्रयोग करण्याची परवानगी दिली आहे. कारण ब्राबर्निग मूव्हमेंटच्या स्त्रियांनी नाटक न पाहता वा न वाचताच ते बंद पाडलं होतं. नाट्य रसिक हो, न्यायालयातील दिरंगाईमुळे निकाल मिळायला इतका उशीर झाला की, तेव्हा झालेला मुलगा आता लग्नाला झाला आहे. जेहेत्ते काळाच्या ठायी काळाची गती गहन आहे. कालचक्राचे काही फेरे ब्राबर्निगच्या स्त्रियांनी फिरविले आहेत आणि जगाच्या रहाटगाडग्यावरचा आम्हा पुरुषांचा मृत्तिका कुंभ उलटा झाला आहे. एके काळी मुलगा झाला की आनंदाने लोक पेढे वाटीत. आता मोठ्या दु:खाने बर्फी वाटतात आणि मुलगी झाली तर पेढे वाटतात. परवाचीच गोष्ट! माझ्या मित्राच्या पत्नीला मुलगा झाल्याचं नर्सनं सांगितलं मात्र, ती जी बेशुद्ध पडली ती बारशाच्या दिवशी शुद्धीवर आली. कारण 'मुलगा जाहला! श्रीमंत लोक गर्भजलपरीक्षा करून घेतात आणि तो गर्भ मुलाचा आहे असं निदान झाल्यास त्याचा नाश करतात. अशा किती अर्भकांचे बळी गेले असतील ते एक डॉक्टरानाच ठाऊक! आजकाल मुलाला मुलगी

द्यायला सहजासहजी कोणी तयार होत नाहीं. आपल्या साक्षींनेच आम्ही आमच्या मुलासाठी वधुसंशोधनाचे प्रस्थान ठेवतो आहोत. अरे, बाळ (बाळ येतो) वधुसंशोधन प्रवासाची सर्व तयारी झाली काय ?

**बाळ** : करता आली तेव्हढी केली.

**सूत्रधार** : वहानाची सोय काय केली आहेस ?

**बाळ** : सुटमुटी प्रवासासाठी मी, कुणाची तरी स्कुटर पाहाणार होतो, पण जमलं नाही !

**सूत्रधार** : निदान दुचाकी तरी ?

**बाळ** : बिन चाकी प्रवास करावा असं म्हणतो.

**सूत्रधार** : म्हणजे ?

**बाळ** : पदयात्रा करायचं ठरविलं आहे. का म्हणून नाही विचारलंत ?

**सूत्रधार** : का ?

**बाळ** : त्यामुळं विनोबाजीचा आशीर्वाद मिळाला तर, स्थळ लवकर जमेल.

**सूत्रधार** : ते असो, तयारीचा भाग म्हणून भारदस्तपणासाठी तुला मी बाळ ऐवजी बालकराम म्हणणार आहे.

**बाळ** : आणि तुम्हाला त्रिंबक ऐवजी तिबुनाना म्हटलं तर ?

**सूत्रधार** : ते असो. आणखी काय काय तयारी केली आहेस ?

**बाळ** : झाडून साऱ्या वर्तमानपत्रात जाहिराती दिल्या आहेत. मोठमोठी पोस्टर्सही छापून घेतली आहेत.

येणार ! येणार ! एक मुलगी देणारास दोन मुलगे फुकट ! तारखे-कडे लक्ष ठेवा.

**सूत्रधार** : चला तर ! प्रवासाला सुरुवात करू. दक्ष ! (संचलन करावे तसे बॅंडवादन)

**टूर निघाली टूर दूर दूर दूर–**
**वाम दक्षिण–वाम दक्षिण**
**एक–दो, एक–दो, एक–दो–**
**टूर निघाली टूर दूर दूर दूर**
**वामवर्त** (डाविकडे वळतात) **वाम–दक्षिण वाम–दक्षिण**
**टूर निघाली टूर दूर दूर दूर–**

दक्षिणवर्त (उजवीकडे वळतात)

सोलापूर, कोल्हापूर, बेलापूर, बदलापूर

(ठेका आगगाडीच्या गतीप्रमाणे)

मुलगी देता का हो मुलगी ऽऽऽ एका मुलाला हवी

आहे एक मुलगी ऽऽऽऽ (बांगडीवाल्याप्रमाणे ओरडतात)

एक मुलगी देणारास दोन मुलगे फुकट.

टूर निघाली टूर टूर टूर टूर.. ...

इंदापूर, जबलापूर, सोलापूर, कोल्हापूर

टूर निघाली टूर टूर टूर टूर......

(कानडी ज्योतिषी प्रवेश करतो)

**ज्योतिषी** : अय्यो य्योऽऽ पीपल. टूरवाल सर, सर, विश्राम ! रुक जाव ! स्टॉप ! भो भो महाशय ही रस्ता कुटे जाते ?

**सूत्रधार** : हा रस्ता कुठेच जात नाही आम्हीच रस्त्याने जात आहोत.

**ज्योतिषी** : अय्यो, योऽऽ टूरवाला सर, असा काय बोलतोरे ?

**सूत्रधार** : तुम्ही महाराष्ट्रीयन दिसत नाही.

**ज्योतिषी** : आमी कानडीयन् असतो.

**बाळ** : म्हणजे कॅनडाचे ?

**सूत्रधार** : जॉन केनडीचे नातेवाईक तर नाही ?

**ज्योतिषी** : नो, नो, सर—आंध्र प्रदेशा आमचा मदर व्हिलेज असतो मातृभूमी ! आमी कानडी असतो.

**बाळ** : म्हणजे ज्याचा कान इंग्रजी ' डी ' सारखा असतो, तो कानडी.

**ज्योतिषी** . (रागाने कानडीमधे कर्णकठोर बोलतो)

**सूत्रधार** : कोरे मडके मे खडा डालके कुडुम् कुड़म् बोलेगा ओ कानडी राइट ?

**ज्योतिषी** : तोड्डा तोड्डा राईट्ट नो ऑल राईट्ट. आमी तोड्डा कानडी तोड्डा मद्रासी असतो मद्रासी प्लस कानडी—मद्रो—कानडी.

**बाळ** : हाफ कानडी आणि हाफ मद्रासी म्हणजे अक्करमासी. मिक्स ब्लड ?

**ज्योतिषी** : नो मिक्स ब्लड जी मिक्स लँग्वेज. तामिळनाडू आंध्रप्रदेशा बॉर्डरमे ऱ्हातो सर. मिक्स लँग्वेज बोलतो. मद्रोकानडी.

२२४६४ २२।६।८९
क्र. ७।१२७५ क्र. ..................

**सूत्रधार :** मद्रोकानडी अप्पा, आंध्र प्रदेश सोडून महाराष्ट्रात वसे हो आलात ?

**बाळ :** किम् कारणम् महाराष्ट्र देशायाम् आगत: !

**ज्योतिषी :** आमी ज्योतिषी असतो. हात बगतो. भविष्य सांगतो. आमी पामिस्ट असतो टूरटूरवाला सर !

**सूत्रधार :** मराठी नाटकात कानडी ज्योतिषी किंवा गायक असावा, असा मराठी रंगभूमीचा संकेत आहे. ठीक झालं आमचे हात पाहा आणि आम्ही ज्या कामासाठी वामवर्त दक्षिणवर्त करीत पायपीट करतो आहोत. ते काम होईल का पाहा !

**ज्योतिषी :** बगतो ! बगतो ! तुजा हँड दाकव बघू. (सूत्रधाराचा हात पहातो) अय्यो य्यो ! हँड कितना सॉफ्ट असतो व्हेरी डेलिकेट्ट ! तुमी वायको शोधायला जातो मॅरेजके वास्ते तुमाला अन्मॅरिड गर्ल हवा पायजे असतो. राईट्ट ?

**सूत्रधार :** यस् सर, सरासरीने भविष्य बरोबर आहे.

**ज्योतिषी :** तुमच्या मराठी लँग्वेजमंदी रामा गणेशन् गोडकरी, मोट्टा ड्रॅमॅटिस्ट असतो ?

**सूत्रधार :** नाटककार राम गणेश गडकरी ? असतो.

**बाळ :** हा भाव बंधनमधला कानडी कामण्णा तर नसेल ?

**ज्योतिषी :** ए, टुरटुरवाला सर. तूम बिटवीन बिटवीन टूरटूर मत करोजी. त्या गोडकरीला एक डॉटर असतो.

**बाळ :** गडकरीला डॉटर नसतो. तो विदाऊट डॉटर असतोजी.

**ज्योतिषी :** अय्यो य्यो तुज्या हस्तरेषेमंदी गोडकरीला डॉटर असतो.

**बाळ :** नो नो.

**ज्योतिषी :** तो त्याचा रेग्युलर डॉटर नसतो.

**बाळ :** रेग्युलर डॉटर नाही ? मग काय अनौरस मुलगी ? गडकऱ्यांची ही भानगड आचार्य अत्रेनाही ठाऊक नव्हती. भो भो भविष्यकारा किम् कारणम्, असत्यम् वदसी ?

**ज्योतिषी :** अय्यो यो. नो नो असत्यम्, सत्यम्, वदामी ! तो त्याचा रेग्युलर डॉटर नसतो. तो लिटरेचर डॉटर असतो.

**सूत्रधार** : लिटरेचअर डॉटर म्हणजे. वाङमयीन कन्या..? वागदत्त वधू असते तशी वाङमयीन कन्या! करेक्ट!

**बाळ** : मद्रोकानडी अप्पा, तुमच्या या संशोधनाबद्दल मेरिट् नसतानाही तुम्हाला डि. लिट् दिली पाहिजे.

**ज्योति** : तू नको रे बिटवीन् बिटवीन् डिस्टर्ब करू. गोडकन्याच्या त्या डॉटरचा नाव ठकी असतो, राईट्ट? ठकी, काला काला कोयलेवाला फास्ट ब्लॅक कलर असतो. गॅरेंटेड फास्ट. करेक्ट? त्याच्या एका डोल्यामंदो फ्लॉवर असतो राईट्ट?

**बाळ** : येडचॅप मद्रोकानडी, फ्लॉवर डोक्यात असतो का डोळ्यात?

**सूत्रधार** : बालकराम, त्याचं भविष्य बरोबर आहे. ठकी बिचारी काळी होती. तिरळी होती. तिची मान वाकडी होती आणि तिच्या एका डोळ्यात फुल पडलं होतं ही गोष्ट खरी आहे. पण त्याचा इथं काय संबंध?

**ज्योतिषी** : रिलेशन सांगतो. ठकीचा फादर तिबूनाना, अँड अंकल बालकरामा ठकीच्या मॅरेजसाठी व्हेरीमच खटपट करतो टूरवर जाऊन अगेन अगेन ट्राय करतो. पण एकबी मरद मॅरेज नाय करतो. काला काला तिरला आंखवाला फ्लॉवरवाला म्हणून ठकीचा मॅरेज नाय होतो. राईट्ट?

**सूत्रधार** : बरोबर. पुढं काय होतं?

**ज्योतिषी** : ठकी कुमारिकाच मरतो. अन्मॅरिड पुवर गर्ल! ठकी, सब मरद लोकोको शाप देतो. कर्स! व्हेरी बॅड कर्स!

**दोघे** : अरे बापरे! शाप! कसला शाप?

**ज्योतिषी** : शाप देतो, पुढच्या पिढीत, मरद लोकासंगती, एक बी बाई मॅरेज नाय करतो.

**सूत्रधार** : तरीच दोन वर्षे प्रयत्न करूनही एकही मुलगी लग्नाला तयार होत नाही.

**ज्योतिषी** : तुमाला दोगांनलाबी मेनी मेनी ट्रबल होतो.

**बाळ** . आम्हा दोघानाच जास्त त्रास का?

**ज्योतिषी** : कारन (सूत्रधाराला) तू गेल्या जनम्चा, ठकीचा फादर तिबूनाना असतो.

**बाळ** : आणि मी?

**ज्योतिषी** . तू त्रिबुनानाचा फ्रेंड याने ठकीचा अंकल असतो. तुमी ठकीचा डायरेक्ट रिलेटीव्ह म्हनून डायरेक्ट ट्रबल डब्बल टिब्बल ट्रबल !

**सूत्रधार** : ठकीच्या शापाची ही पीडा सौम्य होण्यासाठी आणि लग्न जमण्याचा काही उपाय आहे काय ?

**ज्योतिषी** : असतो, असतो उपाय असतो. ते मारोती असतोना मारोती, भारी स्पीडवाला ! सुपरमॅन गॉवरवाला !

**बाळ** : मारुती मोटार ?

**ज्योतिषी** : मोटार नसतो रे .. मंकी गॉड (मारुतीची पोझ घेतो) हनुमान–

**बाळ** : हां हां, रामभक्त हनुमान ?

**ज्योतिषी** : करेक्ट ! त्येचा सॅटरडेला फास्ट कर आनि त्येच्या बेंबीत एक लीटर रिफाइंड पोस्टमन तेल ओतायचा. उमन लोकांचा बीं वर्शिप कर. ट्रबलके बाद मॅरेज जमेगा अय्यो यो, टुर्रवाला सर, आमी व्हेरी व्हेरी लेट झालो. ही रस्ता कुटे जाते ?

**बाळ** : सीधा जहन्नममें जातो.

**ज्योति.** : तो आमीबी जहन्नममे जातो. (जातो)

**सूत्र.** : ट्रबल ! ट्रबल ! ट्रबल ! केल्याने होत आहे रे आधि केलेची पाहिजे.

**बाळ** : जय जय रघुवीर समर्थ ऽऽऽ

**सूत्र.** : **दक्ष ! टूर निघाली टूर दूर दूर दूर.**

**महाड, खेड, दापोली, चिटळूण,**
**बाणकोट ,मंडणगड, रत्नागिरी, राजापूर.**
**मुलगी देता का हो मुलगी ऽऽऽ–**
**ना जातीची, ना उंचीची, ना रंगाची**
**ना कसलीही शर्त आमुची.**
**मुलगी देता का हो मुलगी ऽऽ**

(ठेका लेफ्ट राईट करीत चाललेल्या मार्चिंगसारखा)

**बॉबकट्, बॉयकट्**
**शॉटकट् लॉंगकट्**
**कसलीच नाही अमूची कटकट.**

सधवा, विधवा
किंवा जयव्होर्सवाली मुलगी देता काहो मुलगी ऽ
देशस्थ, कोकणस्थ
चांद्रसेनीय, कायस्थ
चिनी, जर्मनी वा इंग्लडस्थ
मुलगी देता काहो मुलगी ऽ ऽ ऽ
दूर निघाली दूर दूर दूर दूर
वाम–दक्षिण वाम–दक्षिण
दक्षिणवर्त वामवर्त परीवर्त
उपविश (बसतात)

**सूत्रधार** : रामा ! रामा ! शांतारामा दमलोरे बाबा दमलो ! (स्वत:चे पाय दाबतो) बालकरामा, ठकीचा शाप खरंचरे पुरुष वर्गाला भोवणार ! घरी घरकाम करून कंटाळलो, म्हणून या वधूसंशोधनाला निघालो. दोन वर्षे होत आली बाटाचे सेलमधे घेतलेले. शंभर जोडे फाटले. पण एक जोडा जमेल तर शपथ ! आम्हा पुरुषाना कठीण दिवस आले रे बाबा !

**बाळ** : तिबुनाना, तुम्हाला घरी एवढं काम कसलं असतं हो ?

**सूत्र.** : अरे बालकरामा, तू अजून अविवाहित आहेस. तुला कसं कळणार बाबा ! एकदा माझ्या हातात रुतला करवंदीचा काटा.

**बाळ** : अरे रे रे ! काढून टाकलात ना ?

**सूत्र.** : त्याची पर्वा न करता माझी बायको मला म्हणाली चटणी वाटा.

माझ्या हातात रुतलाय काटा
बायको म्हणते मला चटणी वाटा
कशी मी वाटू ?

(टुणटुण प्रिया व इतर स्त्रिया प्रवेशतात)

**स्त्रिया** : वाटलीच पाहिजे.

**सूत्रधार** : माझ्या बायकोला आलाय् घुस्सा
मला म्हणते लुगडी धुवा नी भांडी घासा
कशी मी घासू ?

स्त्रिया : घासलीच पाहिजेत.

सूत्रधार : माझी बायको जाते हपिसा
मला म्हणते चपला पुसा
कशा मी पुसू ?

स्त्रिया : पुसल्याच पाहिजेत.

सूत्रधार : माझ्या बायकोचा लागतोय डोळा
मला म्हणते गादी घाला
गादी घालून गॅलरित झोपा
कसा मी झोपू ?

स्त्रिया : एकटाच झोप (हंशा)

सूत्रधार : टूर निघाली टूर दूर दूर दूर

टुणटुण : रुकजाव ! अबाउट टर्न, तुमची टूरटूर थांबवा ! तुमची टूर आम्ही दूर जाऊ देणार नाही.

सूत्रधार : नाटक सादर करण्याचा परवाना आम्ही कोर्टातून मिळविला आहे मग तुम्ही आडव्या का आलात ?

प्रिया : कारण स्त्री ही पुरुषाच्या मार्गातली धोंड आहे.

बाळ : धोंडी धोंडी पाणी दे !

टुणटुण : द्यायला नाही पाजायला आलो आहोत !

प्रिया : डावा-उजवा-करीत तुमची टूर भारत भर फिरली, तरी आमचे हक्क आणि अटी मान्य होईपर्यंत तुम्हाला कुणीही मुलगी देणार नाही.

सूत्रधार : ब्राबनिंगच्या विदाऊट ब्रा चार बायका म्हणजे आम दुनियेतल्या तमाम बायका नव्हेत.

टुणटुण : तमाम् बायका आता जाग्या होऊ लागल्या आहेत.

सूत्रधार : मुळीच नाहीत, तुमच्यासारख्या संसारासकट नवऱ्याला आणि लाजेसकट पोराबाळाना सोडणाऱ्या चार उंडग्या बायका म्हणजे सर्व जग नाही.

बाळ : ज्यांना कुटुंबसंस्था न मोडता तडजोडीने संसार करायचा आहे. त्यांचा संसार मोडण्याचा तुम्हाला काय अधिकार आहे ?

**सूत्रधार** : वारंवार असे अडथळे आणलेत तर आम्हालाही तुमच्या विरुद्ध चळवळ उभारावी लागेल ह्या बाजूला !

**टुणटुण** : तुम्हा पुरुषांचा मुक्त संचार, अत्याचार आणि अहंकार सर्व *स्त्रियांच्या लक्षात येण्यासाठी, आम्ही* पुरुषपीडित स्त्रियांची चरित्रे आणि आत्मचरित्रे प्रसिद्ध करणार आहोत मग तर कुणीही मुलगी लग्नाला तयार होणार नाही–

**प्रिया** : कारण पीडित स्त्रियांची चरित्रे, म्हणजे पुरुषानी केलेल्या भीषण अत्याचारांचा आणि माणुसकीला काळं फासणाऱ्या अघोरी कृत्यांचा भयंकर इतिहास आहे–

**सूत्रधार** : अरे रे ! इतक्या लवकर देवपूजेला लागणार ? तुमच्यासारख्याना अजूनही करण्यासारख्या खूप गोष्टी आहेत. चरित्रे लिहिण्याची वेळ अजूनही आलेली नाही.

**टुणटुण** : आम्ही आत्ताच लिहिणार आहोत. पाच वर्षाच्या पोरीपासून, पंचाण्णव वर्षांच्या म्हातारीपर्यंत नाडलेली प्रत्येक स्त्री आपलं आत्मचरित्र लिहिणार आहे.

**प्रिया** : आमच्या संशोधन विभागानं अशा पीडित स्त्रियांचं चरित्र प्रकाशित करण्याचं ठरविलं आहे आमच्या एका भगिनीने 'सहन होत नाही आणि सांगताही येत नाही. असे नवऱ्याने केलेले अत्याचार मोठ्या धैर्याने, 'मला उघडी व्हायचंय' या आपल्या आत्मचरित्रात सांगितले आहेत'

**टुणटुण** : ते वाचल्यावर आंतरजातीय विवाहच नव्हे, तर विवाह संस्थाच नष्ट करावी असं वाटू लागलं आहे.

**प्रिया** : हुंड्यासाठी एकामागून एक तीन बायकांना जाळून टाकणाऱ्या एका पुरुषाच्या चौथ्या बायकोनं आपलंही आत्मचरित्र लिहलं आहे.

**बाळ** : त्याचं नांव काय आहे.

**टुणटुण** : 'मला स्वस्त व्हायचय्'

**बाळ** नाव सेन्सीटिव्ह आणि सनसनाटी आहे !

**टुणटुण** : ती आपल्या चरित्रात लिहिते, असल्या कुटुंबात राहण्यापेक्षा. घरावर लालबत्ती लावून मी सरळ धंदा करीन.

धिक्कार असो, धिक्कार असो
या हुंडाऱ्या पुरुषांचा
जे जाळिती हुंड्यापायी अपुल्या पत्नीला
धिक्कार असो, धिक्कार असो–

विवाह संस्थेबरोबर कुटुंबसंस्थाही नष्ट करायला हवी.

**सूत्रधार** : म्हणजे तुम्हाला मानव वंशच नष्ट करायचा आहे.

**प्रिया** : मानव वंश नष्ट होण्याचं कारण नाही.

**बाळ** : लिहा लिहा ! लिहित्या व्हा ! बोलत्या व्हा–चालत्या व्हा–

**टुणटुण** : काय म्हणून चालत्या होऊ ?

**प्रिया** : सायलेन्स ! आत्मचरित्र चालू आहे.

**टुणटुण** : मी, ही माझं आत्मचरित्र लिहिणार आहे.

**बाळ** . नाव सांगा.

**टुणटुण** : 'अजुनि पाहातेची वाट' लग्नाचं वचन देऊन फसविणाऱ्या पुरुषाचं चरित्र आहे हे !

**प्रिया** : मी तर, वयाच्या प्रत्येक वळणावर एकेक आत्मचरित्र लिहिणार आहे. 'हात नको लावू माझ्या झाडाला', 'तीन झाडे तेरा पक्षी', माझे जीवन गटार गंगा', 'दिवा विझुदे सारी रात', 'बाचते ऐका' वगैरे वगैरे.

**सूत्रधार** : रामा रामा ! शांतारामा.

**टुणटुण** . अहो, हे तर काहीच नाही चंदेरी दुनियेत पत्रकारिता करणाऱ्या श्री कार्टी देवीने, केस चंदेरी झाल्यावर आपलं आत्मचरित्र लिहिलं आहे.

**बाळ** : प्रकाशनापूर्वी सवलतीची किंमत आणि नाव जाहीर करा.

**टुणटुण** : 'माझे प्रियकर माझे परकर.' हे आत्मचरित्र म्हणजे स्त्रियांच्या जीवनगंगेत, पुरुषांनी आपली चारित्र्ये धुवून ती किती मैली केली आहेत याचा मानदंड ठरेल !.

**प्रिया** : 'माझे प्रियकर माझे परकर.' वाचून खुद्द मानवता अश्रूंच्या पुरात न्हाऊन धुऊन निघेल.

**सूत्रधार** : हे न्हात्या–धुत्या बायानो, आमच्या पदयात्रेचा मार्ग सोडा पुढच्या टप्प्यावर सुप्रसिद्ध सिनेकलावंत या पदयात्रेत सामील होणार आहेत.

**प्रिया** : ही गर्दी जमविण्याचा स्टंट आम्हालाही ठाऊक आहे. आम्हीही हेमामालिनीला घेऊन तुम्हाला घेराव घालू.

**बाळ** : चला, बाजूला व्हा असल्या धमकावणीला आम्ही भीक घालीत नाही.

**टुणटुण** : भीक नको पण कुत्रं आवर असं होईल तेव्हा कळेल.

**बाळ** : पुरुषांची नाके कापण्यासाठी लाज सोडून लिहिलेली तुमची ही विवस्त्र चरित्रे म्हणजे चिऊ ताईची गोष्ट ! एक होतं धान्याचं कोठार, एक चिमणी आली एक दाणा टिपून निघून गेली.. ,

**सूत्रधार** : दुसरी चिमणी आली, एक दाणा टिपून निघून गेली. तेच ते आणि तेच ते. तुमचे दाणे कधी संपणार नाहीत आणि चरित्रे कधी थांबणार नाहीत. विषय. पुरुषानी आणि समाजाने केलेले अत्याचार ! ! तुमच्या चरित्र कथेत बदल कधी होणार नाही. तुमच्या या स्त्री जन्माच्या फिलमी कथांना आम्ही भुर्र भुर्र चरित्रे म्हणतो.

**टुणटुण** : बदलणार आहोत. पण आमची चरित्रे नव्हेत पुरुषानी लिहिलेले, स्त्रियांवर अन्याय करणारे ग्रंथ बदलून लिहित आहोत.

**प्रिया** : पुरुषप्रधान समाजरचना नष्ट करण्यासाठी जे जे शक्य आहे. ते ते आम्ही करणार आहोत.

**टुणटुण** : आमच्या महिला खासदार प्रेमललिता, पुरुषानी लिहिलेले, ज्यात स्त्रियांवर अन्याय केलेला आहे, असे रामायण, महाभारत आदि ग्रंथांचे पुनर्लेखन करणार आहेत. पहिला प्रयत्न म्हणून त्यानी 'एकच प्याला' चे पुनर्लेखन केले आहे. पहायचं आहे ...... ? (काळोख)

**निवेदन** : (ब्राबर्निंग मूव्हमेंटचा नाटयविभाग सादर करीत आहे. खासदार प्रेमललिता पुर्नलिखित, टुणटुण ढमढेरे दिग्दर्शित–, 'एकच प्याला'

(रंगभूमी प्रकाशमान होते. सिंधूच्या घरी सिंधू व गीता दारु पीत बसल्या आहेत. त्याच त्याच स्त्रियांनी योग्यती वेशभूषा करून आलटून पालटून भूमिका करावयाच्या आहेत.)

**गीता** : बाईसाहेब, आणखी तुम्ही काय घेणार ? जीन, रम, की व्हिस्की ?

**सिंधु** : मला, जॉनीवॉकर ब्लॅकलेबल आणि होडकाची पाहिजे.

**गीता** : जॉनीवॉकर ब्लॅकलेबल आणता आली नाही. पुरेसे पैसे नव्हते.

**सिंधु** : पैसे नव्हते ? सुधाकराकडून का घेतलें नाहीस ?

**गीता** : सुधाकरानी पैसे दिलें नाहीत. नाही म्हणाले.

**सिंधू** : सुधाकराकडे पैसे नाहीत ? बायकोच्या दारुला पैसे देता येत नाहीत तर हे पुरुष लग्न कशाला करतात ? युसलेस साले ! डर्टी डॉग्ज !

**गीता** : बाईसाहेब !

**सिंधू** : गीता, अजूनही तू मला बाईसाहेब म्हणतेस ! तुला पुरती चढली नाही वाटतं. (उचकी देते) 'बाई मला उचकी कुणाची लागली ?' गीता तू माझी मैत्रीण–तू माझी बहीण–तू माझी आई–तू माझी दाई. तू मला बाई-साहेब म्हणतेस ? सिंधू म्हण सिंधुटली खापिटली म्हण. पण बाईसाहेब म्हणू नकोस !

**गीता** : बाईसाहेब, तुम्हाला सिंधू म्हणणारे थोर लोक निराळे आहेत.

**सिंधू** : कोण आहेत ते थोर लोक ? मला सिंधू म्हणणारे कोण आहेत ? माझ्या घरात मला अग तुग ?

**गीता** : आता हे घर तुमचं राहिलं नाही बाईसाहेब. हे घर रामलालचं आहे.

**सिंधू** : रामलाल ? कोण रामलाल ? रामलालची काय किंमत ?

**गीता** : तुमची वकिलीची सनद गेल्यापासून रामलाल घर चालवतो.

**सिंधू** : घर चालवतो ? घर चालतं ? त्याला पाय फुटले ? माझी सनद गेली त्याची मला पर्वा नाही. उद्या चिक्कार कंट्री पिऊन कोर्टात जाते आणि त्या मुनसफाची ऐसी की तैसी करून टाकते. हायसोसायटीतल्या, 'ब्राबर्निग बाईन क्लब' च्या बायका मला नोकरी देणार आहेत. चल् जाव सनद नही मंगता.

**गीता** : बाईसाहेब, त्या रामलालनं मला या घरात यायची बंदी केली आहे.

**सिंधू** : मी, रामलालला बंदी करते. घर माझं आहे.

**गीता** : तुमचं कोण ऐकतं बाईहेब ? पद्‌माकर आणि बाबासाहेब यांना रामलालनं तार करून बोलावलं आहे.

**सिंधू** : सगळे साले पाजी हरामखोर आहेत. पद्माकर येऊदे नाहीतर त्याचा तो थेरडा बाप बाबासाहेब येऊदे सगळ्यांना लाथ मारून घालवून देते. माझी लाथ कुठं आहे ?

**गीता** : तुमच्या जवळच आहे बाईसाहेब.

**सिंधू** : आण ती इकडे. मी लाथ मारीन तिथं पाणी पाडीन (लाथ मारते) पडलं पाणी ?

**गीता** : पडलं. पण ते ग्लासातलं. आजकाल साल जमिनीत पाणीच नसतं.

**सिंधू** : गीता, मला आणखी दारु पाहिजे.

**गीता** : आता हा एकच प्याला शिल्लक आहे.

**सिंधू** : एकच प्याला ? बाकीची कोण प्यायला ? मला एकच प्याला नको. प्रत्येकवेळी एकच प्याला प्यायला, मी काय नामर्द सुधाकर आहे ? आय वॉंट हंड्रेड प्यालाज् ऑफ वाईन आणि हे काय दारुबरोबर खायला तू काय हे चणे ठेवले आहेस ? चणे खायला मी काय घोडी आहे ? मी नॉन्व्हेजीटेरीयन आहे. अंडी, कबाव, कटलेट, चॉप लाव.

**गीता** : बाईसाहेब !

**सिंधू** : चूप ! हरामखोर साली मुझे दारु मंगता है बस ! बकवास बंद करो. काढ पेला. ओत दारु–सुधाकराच्या पद्माकराच्या आणि त्या थेरडचा बाबासाहेबाच्या समोर पिते. (उचकी) पुरुष दारु पितात आणि आम्हा बायकांना दारु प्यायला बंदी काय म्हणून ? ओत. (गीता प्याला भरू लागते इतक्यात सुधाकर येतो.)

**सुधाकर** : गीता, गीता काय करतेस तू हे ?

**सिंधू** : सुधाकर, ती दारुचा एकच प्याला भरते आहे, हे तुला दिसत नाही ? तुझं लक्ष कुठं असतं ? गीतेकडे ? एक अक्षर बोलू नकोस. मुकाट्याने उभा राहा. गीता आण तो प्याला इकडे. टु युवर बॅड हेल्थ सुधाकर !

**सुधाकर** : गीता, तू अगदी नारीपशु आहेस तुला काही लाजलज्जा आहे की नाही ? बेअक्कल कुठली !

**गीता** : पाहा बाईसाहेब, तुमचा नवरा आम्हाला शिव्या देतो ऐका ! ऐकवत नाही अशा शिव्या देतो. अक्कलवान बाईला बेअक्कल म्हणतो.

**सिंधू** : गीता तू सुधाकरला शिव्या दे. चांगल्या मालवणी शिव्या दे. हवीतर मच्छिंद्र कांबळींची टयुशन घे. तू त्याला शंभर अक्कल म्हण ! सुधाकर तू पुरुष आहेस बायकांसारख्या शिव्या देणं तुला शोभत नाही. तिला शिव्या दिल्यास तर लाथमारीन तुझ्या कंबरड्यात. चल चालता हो. (पिते)

**गीता** : बाईसाहेब. माझ्या नवऱ्याच्या, तळीरामाच्या गळ्यातलं जानवं मी तोडलं. पण तुमचा नवरा आम्हाला शिव्या देतो. काय इज्जत राहिली आमची या घरात ? नवऱ्याच्या गळ्यातलं जानवं तोडणारी आणि कंबरेचा टॉवेल सोडून घेणारी मी मर्द झाशीवाली आहे. प्रती इंदिरा गांधी आहे आणि तुमचा नवरा आम्हाला शिव्या देतो ?

२२४६४ २२।७।५।

**सिंधू** : (धडपटत उठते. बाटली हातात आहे) सुधाकर, जातोस का पितोस? ऊठ गीता, तू सुधाकराच्या गळ्यातलं जानवं तोड. मग प्रातर्विधीला जाताना तो कानाला काय लावतो ते मी पहाते. तोड त्याचं जानवं तोड? तू माझी फ्रेंड आहेस. जीवाची कलेजी आहेस. ऊठ धडपडायला काय झालं? दारु कितीही चढली तरी स्त्रीने पुरुषासारखं धडपडू नये सुधाकराच्या गळ्यातलं जानवं तोड. (गीता तसं करू लागते.)

**सिंधू** : खबरदार, सुधाकर! जागचा हालू नकोस. नाही तर तुझी मान कापीन. गीता, बघतेस काय, तोड त्याचं जानवं. (रामलाल प्रवेशून, गीतेला लाथेने उडवतो)

**गीता** : बाईसाहेब, या रामलालनं आम्हाला लाथ मारली!

**रामलाल** : बेशरम, तुला भोपळ्या मिरचीसारखी चिरून टाकतो. सुधाकर, हिला बंदी करूनही, ही घरात कशी आली?

**सिंधू** : रामलाल, मी तुला विचारते, तू कसा आलास माझ्या घरात? तुझीच सुधाकरला फूस आहे. म्हणून तो दारुला पैसे देत नाही म्हणून त्याचं जानवं तोडायला सांगितलं. पण तोडून तरी काय उपयोग! त्याचं जानवं विकलं तर कलाल एक पैसादेखील देणार नाही. कदाचित एखादा दशग्रंथी ब्राह्मण एखादा पैसा देईलही! पण एका पैशात काय दारु येते? ते काय मंगळमूत्र आहे? गीता जानवं नै मंगता है—छोड दो! त्या दोघाना लाथ मारून घराबाहेर घालव.

**रामलाल** : गीता, तू आधी चालती हो!

**सिंधू** : तूच चालता हो. गीता जाणार नाही. ती आज माझ्या बेडमधे झोपेल! आऊट! आऊट! आऊट!

**रामलाल** : चल सुधाकर, इथं उभं राहाण्यात अर्थ नाही. हा शुद्ध नरक आहे.

**सुधाकर** : रामलाल, या घरातून कुठं जाऊ म्हणतोस?

**रामलाल** : कुठंही! या नरकाबाहेर कुठंही!

**सुधाकर** : हा नरक! जिथे या पतिव्रतेचे पवित्र पाय आहेत तिथं नरक? रामलाल! अरे तू चांगली आंग्लविद्या विभुषित शहाणाना? अरे वेड्या हे पाय जिथे असतील, तिथेच माझा स्वर्ग, तिथेच माझं वैकुंठ आणि तिथेच माझा कैलास. (साथीसह गाणे म्हणतो)

**कसा मी त्यजू पदाला**

**मम सुभग शुभ पदाला**

(सुधाकर सिंधूच्या पायावर डोकं ठेवतो. ती त्याला लाथेने ठोकरते)

**सिंधु** : अशी लाथ मारुन, तुला झुगारुन देईन. (लाथ मारते)

**सुधाकर** : ज्या पायाच्या आश्रयानं, उभं राहायचं, त्या पायांनीच झुगारून दिलं तर कुठं जायचं ? पतिव्रते का असं मला दूर लोटणं झालं ? वैकुंठेश्वरी, माझ्या गळ्यातल्या जानव्यासाठी मला या धुळीत राहायला नको का ?

**सिंधु** : (लाथ मारून) चल चालता हो ! लोचट मेला ! (काळोख, टाळ्या वाजतात. रंगभूमी प्रकाशित होते)

**सूत्रधार** : वा ! वा ! वा ! पुरुषांनी लिहिलेल्या ग्रंथाचे पुनर्लेखन करून, स्त्रियांवरील अन्याय दूर करण्याचा तुमचा प्रयत्न चांगला आहे.

**बाळ** : आता असं करा. तुमच्या त्या खासदार प्रेमललिताबाईंना महाभारत नव्याने लिहायला सांगा. त्यात धर्मराजाऐवजी द्रौपदीच द्यूत खेळते आणि पांडव हरल्यानंतर दुःशासनाची बायको भीमाचं धोतर फेडते असं दाखवा.

**सूत्रधार** : गीतेचेही पुनर्लेखन करा. त्यात भगवानउवाच ऐवजी द्रौपदी-उवाच असं लिहा.

**बाळ** : द्रौपदीने गीता सांगितल्यावर त्यात 'उवा'च फार असणार हे काय सांगायला हवं ? तेव्हा बायानो ! महाभारताचं 'रामायण' आवरून आमची वाट सोडा.

**टुणटुण** : आम्ही तुमची पाठ सोडणार नाही.

**बाळ** : पाठ सोडू नका. वाट सोडा नाहीतर अश्रुधर सोडावा लागेल. चला व्हा बाजूला ! नाहीतर आमच्या पदस्पर्शाने अहिल्येसारख्या पावन व्हाल !

**स्त्रिया** : बरं बरं ! पाहून घेऊ !

**सूत्रधार** : सावधान ! शो मस्ट गो ऑन.

**दूर निघाली दूर दूर दूर दूर**

**दिल्ली, मथुरा, हैद्राबाद**

**काशी, गया, अहलाबाद–दूर निघली दूर**

**नागपूर, उदेपूर, ग्वाल्हेर, इंदूर–दूर निघाली दूर**

मुलगी देता काहो मुलगी ऽऽऽऽ
इंडियन, अँग्लो इंडियन,
इंडोफ्रेंच, इंडो जर्मनी
आफ्रिकी, शहाबादी—
किंवा चालेल मुझफराबादी
मुलगी देता का हो मुलगी ऽऽऽ

स्त्रीचा आवाज : अहो मुलगावाले ऽऽ (डफलीवाले सारखं)

सूत्रधार : ब्राह्मण शेणवी दैवज्ञ
कऱ्हाडा, देवरुखा चित्पावन

आवाज : अहो मुलगावाले ऽऽऽ

सूत्रधार : व्हेज् नॉनव्हेज् किंवा ओव्हर एज
मुलगी देता का हो मुलगी ऽऽऽ

आवाज : अहो मुलगावाले, इकडे या इकडे.

सूत्रधार : सहावारी नऊवारी
गाऊन वा घागरेवाली
मॅक्सी वा मीनीस्कर्टवाली—मुलगी देता का हो मुलगी—

आवाज : अहो मुलगावाले ऽऽ

सूत्रधार : नाही आमची कसलीच अट
उगाच नका करू कट् कट्
असली तर एकच अट
स्त्री जातीची सवस्त्रा वधु हवी

(आता हाक मारणारी स्त्री व तिची मुलगी वाटेवरल्या घरात दिसतात)

स्त्री : अहो मुळगावाले, मुलगा विकायचा आहे का ?

सूत्रधार : म्हणून तर दारोदार हिंडतो आहोत.

आई (स्त्री) : कुठे आहे मुलगा ?

सूत्रधार : हा काय दाखवायला बरोबरच आणला आहे. (बालकराम मुली-सारखा खाली मान घालून बसतो)

**आई** : मुलाचं शिक्षण किती झालं आहे ?

**सूत्रधार** : तो व्ह. फा. पी. टी. सी. आहे.

**मुलगी** : हाऊ नाईस मम्मी ! व्ह. फा. पी. टी. सी. ही एखादी फॉरेन डिग्री आहे का ?

**सूत्रधार** : फॉरेन नाही. कंट्रीच आहे. व्ह. फा. म्हणजे व्हर्नाक्युलर फायनल. म्हणजे मराठी सातवी पास आणि पी. टी. सी. म्हणजे, प्रायमरी टीचर्स सर्टिफिकेट. म्युनिसीपालिटीत किंवा लोकलबोर्डात मास्तरच्या नोकरीला मरण नाही.

**आई** : ठीक आहे. मुलाच्या जातीला जास्त शिक्षण करायचं काय ? घरकाम तर करायचं ! आम्हाला कुक-कम, ऑल परपज् हजबंड पाहिजे. पूर्वीच्या फूलीश बायकांना प्रत्येक बाबतीत वरचढ नवरा हवा होता. याचा परिणाम असा होतो की, नवरा एकदा वर चढून बसला; खाली उतरायलाच तो तयार होत नाही, प्रत्येक बाबतीत. शिक्षण व्ह. फा. पी. टी. सी. चालेल.

**मुलगी** : हाऊ नाईस मम्मी ! होऊ दिलीच; तर हा मास्तर पोरं चांगली सांभाळील ! सार्वजनिक पाळणाघरात ठेवायला नको.

**आई** : मुलाला नोकरी करायलाच पाहिजे असं नाही. मुख्य म्हणजे मुलाला जेवण करता येतं का ?

**बाळ** : होऽऽऽटी. व्ही. च्या बल्लवाचार्य परिक्षेत मला प्रथम क्रमांक मिळाला आहे.

**मुलगी** : हाऊ नाईस मम्मी ! अग, हे टी. व्ही. वरचे दिसतात. टी. व्ही-वरची माशी कशी आहे हो ?

**सूत्रधार** : ती, विर्यानीत पडली !

**आई** : मुलाला कोणकोणते पदार्थ करता येतात ?

**बाळ** : साधा डोसा, मसाला डोसा, घी डोसा, रवा डोसा, कॅडक डोसा, नरम डोसा, असे डोशांचे शंभर प्रकार मला येतात. शिवाय वडा सांबार, इडली सांबार, इडली-वडा सांबार, फ्राईड इडली, मेदूवडा, उत्तप्पम्, उप्पीट, थालीपीठ, कांदा भजी, वगैरे वगैरे वगैरे.

**मुलगी** : हाऊ नाईस मम्मी, अगं, हा मद्रासी दिसतो. याला जास्त कपडे लागणार नाहीत. वर्षाला एक लुंगी आणि पट्ट्या-पट्ट्याची, विडी-काडी ठेवायला खिसेवाली लांडी चड्डी दिली म्हणजे झालं !

**आई** : काय हो, हा मुलगा मद्रासी आहे का ? बोलतो तर मराठी.

**सूत्रधार** : नाही. तो मराठीच आहे. पण, मुंबईतल्या माटुंगा भागात राहिल्यामुळे त्याचं असं माटुंगम् झालं आहे. जेवण मात्र खमंगम् करतो.

**आई** : मुलाला आणखी काय काय येतं ?

**बाळ** : दोऱ्यात सुई ओवता येते. रेशनचे असेल तर खड्यातले तांदूळ निवडता येतात. भरतकाम येतं. पेटी वाजवून गाणं म्हणता येतं. महाराष्ट्र सरकारच्या इंग्रजी शब्दांच्या मराठी भाषांतराचा अर्थ सांगता येतो.

**मुलगी** : हाऊ नाईस मम्मी ! हा डॅडींसारखा नाही. याला कसं सगळं सगळं यतं. मम्मी हाच ऑल परपज् हजबंड मला हवा !

**आई** : थांब ग, बाबी, तुला काय कळतं. आता वरपरीक्षेतील शेवटची परीक्षा राहिली ! चालून दाखवा पाहू ! (बालकराम मुद्दाम मुलीसारखा चालून दाखवितो) अहो, पण हा असा काय चालतो बायकांसारखा ?

**सूत्रधार** : कारण तो पूर्ण पुरुष नाही.

**आई** : म्हणजे ?

**सूत्रधार** : तो अपूर्ण पुरुप आहे

**दोघी** : अय्या !

**सूत्रधार** : म्हणजे तृतीय पंथीय मात्र नव्हे ! तो प्रथम पुरुषी, एकवचनी पुरुषच आहे पण बदललेला काळ लक्षात घेऊन लहानपणापासून आम्ही त्याला ताकीद देत आलो की, तू मुलगा आहेस. तुला जास्त शिकून काय करायचं ? तू मुलगा आहेस, काळोख पडण्यापूर्वी शुभंकरोती म्हणायला घरी परत ये. मुलीसारखा, वचावचा बोलू नकोस. अंग उघडं टाकू नकोस. धसा धसा चालू नकोस. मर्यादशीलपणाने वाग. याचा परिणाम असा झाला की, मुळातून तो पुरुष असूनही. बायकी वळण लावल्यामुळे तो मर्यादशील पुरुष झाला. त्याच्या जन्मजात पुरुषत्वावर मर्यादा घातल्यामुळे तो धड पुरुषही नाही वा पूर्ण स्त्रीही नाही, अशी त्याची अवस्था झाली आहे. अपूर्ण का होईना, पण तो पुरुषच आहे.

**मुलगी** : हाऊ नाईस मम्मी ! हा पूर्ण पुरुष नाही. म्हणजे हा नवरेशाही गाजवणार नाही. मम्मी ! दे ना ग मला हाच नवरा ! होशील ना रे तू माझा नवरा ? तू नवऱ्यासारखा नसल्यामुळे मला कित्ती, कित्ती आवडलास म्हणून सांगू ?

**आई** : तुला काय कळतंय, मी अनुभवानं बोलते नवरा एरवी कसाही असला तरी तो पूर्ण पुरुषच असला पाहिजे.

**लोपामुद्रा** : (प्रवेश करते. सर्वजणी गाणं म्हणतात)

**हा मला दादला नको ग बाई**
**मेला हा पूर्ण पुरुषच नाही**
**याला वरून करू मी काई**

**आई** : हा मुलगा आम्हाला पसंत नाही.

**सूत्रधार** : एकदा दाखविलेला आम्ही परत घेणार नाही.

**लोपामुद्रा** : का परत घेणार नाही ?

**सूत्रधार** : तुम्ही त्याला नापसंत केलात हे जर, इतर बायकांना कळलं तर कोण कशी त्याला पसंत करणार ? नाकारलेल्या मुलात नसलेली खोडी काढतील !

**आई** : आम्हाला पूर्ण पुरुषच मुलगा हवा !

**लोपामुद्रा** : आमची मुलगी ड्रेसावरून आणि केसावरून अपूर्ण पुरुष दिसली तरी ती पूर्ण स्त्रीच आहे.

**सूत्रधार** : तो पूर्ण पुरुषच आहे. तुम्हाला हवा तसाच आम्ही त्याला घडविला आहे. हवं तर मेडिकल चेकअप करा. रिपोर्ट निगेटिव्ह आला तर, नकार द्या !

**लोपामुद्रा** : ठीक आहे. पण हा प्रश्न शारिरिक क्षमतेचा झाला. मेडिकलमधे तो पास झाला तरीही, आमच्या अनेक अटी आहेत.

**सूत्रधार** : तुम्ही कोण ? मुलीची आई आणि मुलगी यांचा हा खाजगी प्रश्न आहे. इथं ब्रावर्निंगचा संबंध काय ?

**लोपामुद्रा** : त्याशिवाय का मी इथं आले ? मुलींच्या लग्नाचं आम्ही राष्ट्रीयकरण केलं आहे. त्याचं नियंत्रण 'ब्राबर्निंग मूव्हमेंट' ही सामाजिक संस्था करते. सांगाहो तुमच्या अटी ममी !

**आई** : लहानपणापासून, आम्ही आमच्या मुलीला संपूर्ण स्वातंत्र्य दिलं आहे.

**लोपामुद्रा** : हो, बुरसटलेल्या आर्थोडॉक्स आईबापाप्रमाणे आम्ही आमच्या मुलीला 'कार्टे, शेण खायला कुठं गेली होतीस ?' असं कधी विचारीत नाही, हो किनई मम्मी ?

**आई** : हो.

**बाळ** : आयाच शेण खायला जात असल्यामुळं मुलीला कसं विचारतील ? अधिकारच काय राहिला ?

**आई** : नवऱ्यामुलाला मधे मधे बोलण्याचा अधिकार नाही.

**बाळ** : मी बोलणार ! किती दिवस असा मी तोंड दाबून बुक्यांचा मार सहन करायचा ? किती वेळा मी स्वतःला दाखवून घ्यायचे ? किती वेळा दोऱ्यात सुई ओवून दाखवायची ? किती वेळा चालून दाखवायचे ? चालून चालून माझे पाय सुजले आणि दोऱ्यात सुई ओवून माझी दृष्टी अंधूक झाली.

**आई** : तुमचा वरपक्ष आहे. असं तोंडाळ बोलणं आम्हाला चालणार नाही सांगून ठेवते. वरानं आपल्या पायरीप्रमाणं राहावं.

**मुलगी** : हाऊ नाईस बोललीस तू मम्मी !

**आई** : ...तर आमच्या मुलीला इथं जाऊ नकोस, तिथं बसू नकोस, हे खाऊ नकोस, ते खा, हे नेसू नकोस, ते नेस, फिदीफिदी हसू नकोस, याच्या त्याच्याजवळ वचावचा बोलू नकोस. मर्यादशीलपणाने वाग. दिवसाउजेडी घरी परत ये. असं बोललेलं मुळीच चालणार नाही. आधीच सांगून ठेवते.

**मुलगी** : मम्मी, त्यांना हेही सांग, मी मंगळसूत्र घालणार नाही.

**बाळ** : (स्वतःशी) वस्त्र तरी घालणार आहे ना ?

**लोपामुद्रा** : चूप ! मधे मधे बोलू नका कायहो पुटपुलला तो ? वराच्या जातीला हे शोभत नाही. आधीच ताकीद देते.

**सूत्रधार** : तो म्हणाला, वेडिंग-साडी कोणत्या प्रकारची घ्यायची ! बनारसी शालू, तानचोयी, चायना सिल्क, बटर सिल्क की गोल्डन सिल्क ?

**मुलगी** : लग्नानंतर वस्त्र नेसायचं की नाही हे मी ठरवलेलं नाही. साडीसारखं वस्त्र मला अवजड वाटतं. सुटसुटीत ड्रेस हवा.

**लोपामुद्रा** : चटकन सुटण्यासाठी सुटसुटीत वस्त्र बरं. नाहीतर हुंड्यासाठी जाळून सुनेची साडी स्टोव्हवर पेटली म्हणून सांगतात.

**सूत्रधार** : ठीक आहे ! तुमच्या मर्जीप्रमाणं वस्त्र परिधान करा.

**मुलगी** : मुख्य म्हणजे कालबाह्य ठरलेले नीतिअनीतीचे बुरसटलेले जुनाट नियम मी पाळणार नाही.

**सूत्रधार** : म्हणजे ?

**मुलगी** : म्हणजे लैंगिक संधंब ! एखादा पुरुप केवळ नवरा आहे म्हणून त्याच्याशीच ते ठेवावेत हे मला मान्य नाही. हो किनई ग मम्मी ?

**बाळ** : अहिल्या, सीता, तारा, द्रौपदी, मंदोदरी या पंच पतिव्रतानो ऐकता आहात ना तुम्ही हे ?

**मुलगी** : जोपर्यंत माझं नवऱ्यावर व नवऱ्याचं माझ्यावर उत्स्फर्त प्रेम आहे तोपर्यंत नवऱ्याशी माझे लैंगिक संबंध राहातील.

**आई** : हाऊ नाईस बोलली माझी बाबी ! आहेच मुळी माझी बाबी हुशार ! लहानपणापासून दिलेल्या स्वातंत्र्याचा फायदा झाला.

**लोपामुद्रा** : हाय सोसायटीत मोकळ्या वातावरणात मुली वाढल्या की, अशा फ्री आणि सॉफिस्टीकेटेड मॅनर्सच्या होतात.

**मुलगी** : हाय ! डॉ. लोपामुद्रा ! हाय मम्मी ! अशा स्वातंत्र्यामुळेच हवं तिथं आणि हवं तेवढं शेण मी खाल्लं. पण माझ्या डियर मम्मीनं मला, 'कार्टे कुठं शेण खायला गेली होतीस' असं विचारलं नाही कधी. होय किनई ग मम्मी ? (गळ्यात पडते)

**सूत्रधार** : अहो, हा व्यभिचार आहे. अनीती आहे ! अधर्म आहे !

**लोपामुद्रा** : तुम्ही चार बायकांशी चोरटे संबंध ठेवता तेव्हा व्यभिचार होत नाही ?

**मुलगी** : तेव्हा जातो कोठे मानवसुता तुझा धर्म. (हसतात)

**सूत्रधार** : पण आमच्याशी असा संबंध ठेवणाऱ्या स्त्रियाच असतात ना ? ब्रार्बनिग अशा स्त्रियांना का आवरीत नाही ?

**बाळ** : तिबुनाना ब्रार्बनिगच्या चार बायका म्हणजे सर्व जग नव्हे जोपर्यंत शबाना आझमी, स्मिता पाटील, हेमा मालिनी, सारिका यांच्यासारख्या स्त्रिया महिला समाजात आहेत, तोपर्यंत एकच काय आम्ही दोन दोन लग्न करू. मिया बिबी राजी होगा तो तुम ब्रार्बनिग के काझी क्या करेगा ?

**लोपामुद्रा** : ते आमचं आम्ही पाहून घेऊ !

**सूत्रधार** : आम्हाला दाखवू नका. पण तुमचं तुम्हीच तर पाहाल की नाही ? उगाच पुरुषांना दोष कशाला देता ?

**लोपामुद्रा** : नीती अनीतीचं म्हणाल तर एकाची अनीती ती दुसऱ्याची नीती असते. त्यात तरी रेग्युलॅरिटी कुठं आहे ?

**सूत्रधार** : जरूर आहे सर्व जगात यावावतीत नीतीनियम सारखेच आहेत !

**लोपामुद्रा** : मुळीच नाहीत. प्रत्यक्ष उदाहरणच सांगते.

**सर्वजणी** : सांगा सांगा !

**लोपामुद्रा** : एकदा मी गोव्याला कोलवा बीचवर गेले होते.

**बाळ** : एकट्याच ?

**लोपामुद्रा** : हो, एकटीच ब्रार्वनिंगच्या कामासाठी गेले होते.

**बाळ** : गोवा बीचवर 'ब्रार्वनिंग'चा प्रोग्रॅम होता का ?

**लोपामुद्रा** : तुम्ही मधे मधे बोलू नका ! समाजशास्त्राच्या अभ्यासासाठी गले होते.

**आई** : जगातल्या, सर्व समाजातले स्त्री–पुरुप बीचवर जमतात. तिथंच अभ्यासाला वाव असतो.

**लोपामुद्रा** : तर गमत काय झाली, तिथं गोऱ्या गोऱ्या अंगाची दहाबारा तरुण पोरं, पोरी घोळका करून बसली होती

**मुलगी** : फॉरेनर, हिप्पी असतील !

**लोपामुद्रा** : तर ती पोरं चक्क दिगंबर अवस्थेत उन्हात बसली होती.

**मुलगी** : हाऊ नाईस मम्मी ! ती सन बाथ घेत असतील, सूर्यस्थान ! ते तसंच घेतात मोकळ्या अंगानं कित्तीं मज्जा येत असेल नाही मम्मी ? सर्वांगावर सूर्यकिरण कसे; कीस घेतल्यासारखे फिरत असतील, म्हणूनच मला वाटतं कुणा कवीनं म्हणलं आहे जहांन देखे कवि वहां देखी रवी आणि आम्हाला मात्र बाथरुममध्येसुद्धा असं करता येत नाही ! फॉरेनचं वातावरण कसं मोकळं ढाकळं असतं नाही का ग मम्मी ?

**लोपामुद्रा** : अगं, खरी गंमत पुढंच आहे. त्या तरुणांना मी बिचारलं, तुम्ही वस्त्र परिधान का करीत नाही ?

**मुलगी** : असे नेकेड का फिरता ?

**लोपामुद्रा** : तर त्या टार्गट कार्ट्यांनी उलट मलाच एक विवस्त्र प्रश्न विचारला ?

**बाळ** : वस्त्र न नेसता विचारलेला प्रश्न विवस्त्रच असणार ! काय विचारलं त्यांनी ?

**लोपामुद्र** : त्यांनी विचारलं तुम्ही वस्त्र का वापरता ?

**मुलगी :** अय्या ! मग ?

**लोपामुद्रा :** मी म्हटलं वस्त्र वापरणं ही आमची संस्कृती आहे.

**सूत्रधार** : हे मात्र बरोबर बोललात

**लोपामुद्रा :** ...तर, ती वात्रट कार्टी म्हणाली, वस्त्र न वापरणं ही आमची संस्कृती आहे (हशा)

**आई :** बोला आता ! अश्लीलमार्तंड संस्कृतीसंरक्षक कृष्णराव मराठे, काय म्हणणं आहे तुमचं ?

**मुलगी :** त्या मुलांनी, तुमची चांगलीच फिरकी घेतली !

**लोपामुद्रा** : अगं, फिरकी अशी फिरली की, मला काहीच बोलता येईना ! अगदी बरोबर आहे त्या मुलांचं.

**सूत्रधार** : काय बरोबर आहे ? पाश्चात्य संस्कृती वेगळी आणि आम्हा भारतीयांची संस्कृती वेगळी.

**बाळ** : सर्व जगात श्रेष्ठ आहे ती ! रामायण, महाभारत वाचा.

**लोपामुद्रा :** महाभारतातच स्त्रियांवर फार अन्याय झाला आहे धर्मराज न्यायी होता ना ? मग त्यानंच द्रौपदीवर अन्याय कसा केला ?

**सूत्रधार** । काय अन्याय केला त्यानं ?

**लोपामुद्रा** : द्रौपदी पाच पांडवांची बायको !

**मुलगी :** म्हणजे प्रत्येक पांडवाच्या वाट्याला एक पंचमांश द्रौपदी !

**लोपामुद्रा :** तू गप्प ग ! त्या मेल्या नारदानं द्रौपदीची पाच पांडवात वाटणी करताना वर्षाकाठी, दोन महिने बारा दिवस एकेका पांडवाची बायको व्हायला तिला सांगितलं !

**सूत्रधार :** त्यात काय अन्याय झाला ? द्रौपदी त्यांची धर्म पत्नीच होती !

**लोपामुद्रा** : अन्याय नाहीतर काय ? प्रत्येक पांडवाला वर्षाकाठी दोन महिने बारा दिवसच काम, द्रौपदीला मात्र वर्षाचे बारा महिने ! (हस्यकल्लोळ ; प्रत्येकाच्या घरी रांधा, वाढा, उष्टी काढा !

**मुलगी** : हाऊ फनी बोलता तुम्ही. डॉ. लोपामुद्रा ?

**बाळ :** त्यांनी, रीराईट केलेलं महाभारत वाचलेलं दिसतं.

**आई :** गप्प बसा हो तुम्ही ! त्या वेळी ब्राबर्निंग मूव्हमेंट असती. तर, त्या मेल्या नारदाची आणि पांडवांची ऐसी की तैसी करुन टाकली असती ! नाही का हो डॉ. लोपामुद्रा मॅडम ?

**बाळ :** (अवघडलेला) अहो, पण, काय ते लवकर ठरवून टाका. अशा अवघडलेल्या वरपक्ष पोझमधे मी किती वेळ बसू ?

**आई :** आमच्या मुलीची महत्त्वाची अट तुम्हाला मान्य आहे का ?

**बाळ :** काय वाट्टेल ते झालं तरी स्वैरसंबंधाला मी मान्यता देणार नाही. कसाही असलो तरी मी नवरा आहे. नासली मिरी म्हणून केरासमान होत नाहीत.

**मुलगा :** मम्मी, त्यांना विचार तुम्ही शंभर प्रकारचे डोसे कशासाठी करता ?

**बाळ :** म्हमजे काय ! जितक्या व्यक्ती तितक्या आवडी एकाच प्रकाराच्या डोशाचा दररोज कंटाळा येणार नाही का ?

**मुलगी :** मग मी म्हणते आम्हालाही जन्मभर एकाच नवऱ्याचा कंटाळा येणार नाही का ?

**सूत्रधार :** नवरा म्हणजे काय तुम्ही मद्रासी डोसा समजलात ?

**मुलगी :** मी, कॅटरिंगचा कोर्स केल्यामुळे फूड लॅंग्वेजमध्ये बोलले. डॉ. लोपामुद्रा तुम्ही तुमच्या मॅरेज लॅंग्वेजमध्ये सांगा.

**लोपामुद्रा :** मीच कशाला सांगायला पाहिजे ? तुमच्या त्या कवी गोविंदा करंदीकरांनीच पुरुषांच्या आवडीनिवडीबद्दल स्पष्ट सांगितलं आहे ना ?

**बाळ :** गोविंदा नव्हे हो विंदा करंदीकर.

**लोपामुद्रा :** अहो, ते मुळचे गोविंदा करंदीकरच. पण नवकाव्यात, मर्ढेकर जसे, ठाकूरद्वारला टांग मारुन शॉर्टकटनं, कांदेवाडीतून गायवाडीत गेले. तसं 'गोविंदा' मधल्या 'गो' ला टांग मारून तुमचे हे गोविंदा–विंदा करंदीकर झाले.

**मुलगी :** हाऊ फनी आर दीज् शॉर्टकट्स् ॲन्ड नेम्स ऑल्सो !

**लोपामुद्रा :** त्यांचं नाव फनी नाही. काव्य फनी आहे. त्यांनीच लिहिलं आहे ना आपल्या कवितेत ?

**सकाळपासून रात्रीपर्यंत**
**तेच ते ! तेच ते !**
**तेच मुरके तेच चाळे**
**तीच 'पलंग' तीच नारी**

त्याच, त्याच नारीचा तुम्हा पुरषांना कंटाळा येतो ना ?

**मुलगी :** मग आम्हाला का येऊ नये ? आम्ही ही का म्हणू नये ?

रात्रीपासून सकाळपर्यंत
तेच ते ! तेच ते !
तेच फदफदं तेच पापलेट
कधीमधी सोलाची कढी
रात्र मोठी गंमत थोडी,
तीच बिछाना तीच चादर
तीच 'पलंग' तीच 'नर'

**आई** : हाऊ नाईस कविता करते माझी बाबी !

**सूत्रधार** : म्हणजे तुम्ही पलंगपोस बदलतात तसा नवराही बदलणार काय ?

**आई** : शब्दशः अर्थ नका घेऊ हो ! सेन्स लक्षात घ्या !

**बाळ** : या सगळ्या गोष्टी नॉन्सेन्स आहेत !

**लोपामुद्रा** : नवराबायकोचे *इतर संबंध चांगले* नसताना, दहशतीने समाजाच्या भीतीने नवराबायकोचे संबंध चालू राहातात हीच खरी सामाजिक अनीती आहे आणि अशा संबंधातून निर्माण होणारी संतती हीच खरी अनौरस संतती आहे.

**सूत्रधार** : अहो, ॲनासिनच्या चार गोळ्या देता का ! माझं डोकं गरगरायला लागलं. मला लेक्चरची ॲलर्जी आहे !

**बाळ** : मी अजून किती वेळ अवघडून बसू ? काय ते लवकर ठरवा.

**आई** : तुम्हाला आमच्या अटी मान्य नसतील तर तुम्ही पदयात्रेला जाऊ शकता. चला ग उठा, जा आपल्या कामाला. (जाऊ लागतात.)

**सूत्रधार** : अहो, क्षुल्लक कारणासाठी लग्न नका हो मोडू ! तुमची अट तत्वतः मान्य करण्याचा विचार आम्ही करू.

**लोपामुद्रा** : तत्वतः नाही. अटी मान्य असल्याचे तुम्हाला ॲग्रिमेंट करून द्यावं लागेल.

**सूत्रधार** : आणखी काय काय अटी आहेत तुमच्या ?

**मुलगी** : मम्मी, त्यांना सांग लग्नानंतर मी नावासकट विकली जाणार नाही.

**सूत्रधार** : म्हणजे ?

**मुलगी** : म्हणजे, मी नवऱ्याचं नाव आणि आडनाव लावणार नाही.

**बाळ** : मग कुणाचं लावणार ?

**मुलगी** : मी नाव बदलणार नाही आणि माहेरचं आडनाव लावीन.

**सूत्रधार** : माहेरचं आडनाव हे ही एका पुरुषाचं असणार आहे ना ?

**मुलगी** : हाऊ फुलिश ॲम आय मम्मी ? हे माझ्या लक्षातच आलं नाही. मग, मी माझ्या मम्मीचं नाव लावीन आडनाव म्हणून.

**लोपामुद्रा** : हाऊ क्लेव्हर्ली बोललीस तू बार्बी !

**बाळ** : बोल बार्बी बोल ग ! तुझ्या आडाचं पाणी लई खोल ग.

**लोपामुद्रा** : कित्ती वेळा सांगायचं तुम्ही मधे मधे गाणी म्हणू नका. अगं, जाबालीनंही आपल्या नवऱ्याच नाव न लावता आपला मुलगा सत्यकाम याला आपलंच नाव लावलं होतं.

**मुलगी** : हाऊ नाईस डॉ. लोपामुद्रा मॅडम !

**सूत्रधार** : तुमच्या मम्मीला विचारा तिचं नाव लावलं तर चालेल का ?

**मुलगी** : अय्या ! त्यात काय विचारायचं ? डॅडीप्रधान संस्कृती मम्मीलाही मान्य नाही !

**सूत्रधार** : अहो, जाबाली ही गणिका होती. तिच्याकडे येणाऱ्या अनेक पुरुषांपैकी सत्यकामचा नक्की बाप कोण हे तिला ठाऊक नव्हतं. तुमच्या मम्मीला तुमच्या बापाचं नाव ठाऊक नाही का ?

**मुलगी** : हाऊ फुलिश ॲम आय मम्मी ! मग मी, सासरचं आणि माहेरचं असं डब्बल नाव लावीन बर्वेइनामदार सारखं !

**मुलगी** : तुमचं आडनाव काय हो !

**बाळ** : लग्नानंतर ते बदलणार आहे म्हणून आत्ताच सांगत नाही.

**मुलगी** : म्हणजे मी नाही समजले मम्मी !

**बाळ** : लग्न झाल्यावर आम्ही पुरुष, बायकांची नावे आडनावासारखी लावणार आहोत.

**सूत्रधार** : ठीक आहे. तुमच्या नवऱ्यातला तुमचा सर्वतऱ्हेचा इंटरेस्ट संपला म्हणजे हे कॉंट्रॅक्ट मॅरेजही संपेल तेव्हा झालेल्या वा होऊ घातलेल्या मुलांचं काय ?

**लोपामुद्रा** : मुलांसाठी भांडण्याचं कारण नाही. मुलं ही अगदी क्षुल्लक बाब आहे. मुलं स्त्री किंवा पुरुष सांभाळील.

**सूत्रधार** : पण, दोघांनीही विश्वामित्रासारख्या काखा वर केल्या तर ?

**लोपामुद्रा** : ती जबाबदारी समाजाची किंवा राष्ट्राची आहे. मुलांचंही राष्ट्रीयकरण व्हायला हवं !

**बाळ** : गीतेतला 'कर्मवाद' खऱ्या अर्थाने मला अत्ता कळला. म्हणजे फळाची पर्वा न करता तुम्ही बायका फक्त 'कर्म' करीत राहाणार !

**सूत्रधार** : (रागाने) नवनीती प्रस्थापित करणाऱ्या मातानो ! या समाजाच्या किंवा सरकारच्या पांजरपोळात कदाचित या पोरक्या पोरांना अन्न, वस्त्र आणि निवारा मिळेल. पण पोटभर भाकरी म्हणजे प्रेम नव्हे–ही पोरं कुत्रीच्या पोरांसारखी संस्कारहीन वाढत राहतील आणि माणूस परत पशू-सारखा रानटी होईल !

**बाळ** : बस्स ! बस्स ! तुमच्या अटी आम्हाला मान्य नाहीत तुमची मुलगी आम्हाला पसंत नाही.

**स्त्रिया** : (आक्रमक) का पसंत नाही ?

**प्रिया** : (प्रवेशून) नही चलेगी नही चलेगी पुरुषशाही नहीं चलेगी. (घोषणा गोंधळ)

**दुर्गा** : (प्रवेशून) कसली घोषणाबाजी चालली आहे ?

**लोपामुद्रा** : घोषणाबाजी नाही आजी, ही दगलबाजी आहे. पण तुम्ही कोण ?

**मुलगी** : एकाएकी कशा प्रवेशलात नाटकातल्या पात्रासारख्या.

**दुर्गा** : मी दुर्गा !

**आई** : अय्या ! दुर्गा भागवत तर नव्हेत ?

**सब** : बापरे ! दुर्गा भागवत. (आश्चर्य चकीत. भयभीत)

**सर्व** : (आरती म्हणतात)

**दुर्गे दुर्घट भारी तुजवीण संसारी**
**अनाथ नाथे अंबे करुणा विस्तारी**
**तारी तारी आम्हां ललनाते तारी**
**बळी ठरलो आम्ही पुरुषांच्या नारी ।। १ ।।**

**जय देवी जय देवी पुरुषासुरमर्थीनी**
**भागवत कुलोत्पन्ने संकट निवारी ।। धृ. ।।**

**अफाट व्यासंग् तुझा असीम विद्वत्ता**
**फटकळ वाणी तुझी अभ्यास पूर्णा**
**ज्ञानतपस्विनी तू साहित्य दुर्गा**
**तोडी फोडी आता पुरुषांच्या 'दुर्गा' ।। २ ।।**

झिडकारिली पद्मश्री गडगडलें ब्रह्मांड
आणिबाणीत आले तुजवर कुभांड
कऱ्हाड संमेलनी थरथरले यशवंत
पु. लं. ची तर दुर्गे बोबडी वळत ॥ ३ ॥

दुर्गामाता की जय

(सर्वजणी साष्टांग नमस्कार घालतात)

**दुर्गा** : असल्या आरतीने प्रसन्न होणारी मी नव्हे !

**मुलगी** : बाई, तुम्ही दुर्घट भारी आहात हे आम्ही जाणतो.

**लोपामुद्रा** : पण तुमच्यासारख्या ज्ञानतपस्विनी, मानवशास्त्रज्ञ दुर्गेला शरण जाण्याशिवाय दुसरा पर्याय राहिलेला नाही.

**आई** : आम्ही किंकर्तव्यमूढ झालो आहोत !

**दुर्गा** : पण, तुम्ही कोण ? (लोपामुद्रेला)

**लोपामुद्रा** : मी, म्हणजे डॉ. लोपामुद्रा. आम्ही 'ब्रावर्निग मूव्हमेंट' कार्यकर्त्या आहोत.

**दुर्गा** : 'ब्रावर्निग'? (हंसतात) कसलं कार्य करता तुम्ही ?

**प्रिया** : स्त्री मुक्तीचं.

**दुर्गा** : कुणापासून मुक्ती ? कुंकू, बांगड्या आणि मंगळसूत्रापासून ?

**लोपामुद्रा** : बाई, मला तुमच्या व्यक्तिमत्वाची भीती वाटते. रागवणार नसाल तर एक प्रश्न विचारू ?

**दुर्गा** : अगं, विचार नाही रागवणार ?

**लोपामुद्रा** : म्हणजे .., तुमचं लग्न झालं असतं तर तुम्ही मंगळसूत्र घातलं असतं ?

**दुर्गा** : (दुर्गाबाई एकदम हसतात त्यामुळे वातावरण मोकळे होते. बाकीच्याही अदबीने हसतात) अगं, घातलं असतं, न घालायला काय झालं ? सौभाग्यालंकार वापरणं हा वैयक्तिक इच्छेचा प्रश्न आहे.

**बाळ** : इच्छेचा नाही. सक्तीचा आहे. आत्ताच या मुलीनं मी बांगड्या घालणार नाही, मंगळसूत्र घालणार नाही सांगितलं.

**दुर्गा** : (हसतात) स्त्रीमुक्ती चळवळ आणि हे अलंकार यांचा परस्पर संबंध काय आहे मला कळत नाही ?

**लोपामुद्रा** : बाई, हे सौभाग्य अलंकार म्हणजे पुरुषशरणतेची चिन्हे आहेत. म्हणून आम्हाला त्यांच्यापासूनही मुक्ती हवी आहे.

**दुर्गा** : आधी, 'मुक्ती' हाच तुम्हा स्त्री-पुरुषांचा भ्रम आहे. स्त्री मुक्तीच्या विचाराने पुरुषांची बरोबरी करण्यासाठी जे जे पुरुष करतो ते ते तुम्ही करता हे सर्व ठिक आहे. परंतु पुरुष कुंकू लावत नाही आणि म्हणून आम्हीही लावणार नाही. या युक्तिवादात तथ्य नाही.

**प्रिया** : मग आम्ही काय कराव ?

**दुर्गा** : जे मला आवडत नाही, जे शोभत नाही; ते मी करणार नाही. धर्मनिदर्शक कोणतेही चिन्ह मी वापरणार नाही. असं पुरुषांना ठणकावून का सांगत नाही ?

**मुलगी** : तेच तर आम्ही करतो आहोत. पण पुरुष आमचं ऐकत नाहीत. उलट चेष्ठा करतात.

**दुर्गा** : पुरुष तरी कुठं मुक्त आहेत. त्यांनाही मुक्तीची गरज आहे. त्यांनाही रुढीपासून मुक्ती हवी, अंधश्रद्धेपासून मुक्ती हवी. अहंकार, जुलूम, अराजक यापासून मुक्ती हवी. हरतऱ्हेच्या विनाशकारी हव्यासापासून मुक्ती हवी आहे.

**लोपामुद्रा** : आणि म्हणूनच या सर्व व्यसनांचा अहंकार बाळगणाऱ्या पुरुषप्रधान संस्कृतीपासून आम्हाला मुक्ती हवी आहे.

**दुर्गा** :
**प्रिया** : } आम्हाला पुरुषांची कसलीही बांधिसकी नको.

**लोपामुद्रा** : हे बांधिलकीचं दावं आम्हाला तोडायचं आहे !

**दुर्गा** : (हसतात) ज्यांना बांधिलकी नको त्यांना मुक्तीचा आनंद मिळणार नाही. आदर्श समाजरचना म्हणजे जिथं स्त्री–पुरुष या दोन घटकांचा समन्वय साधला जाईल ती. अगं, तुझं माझं जमेना आणि तुझ्याशिवाय करमेना. अशी स्त्री–पुरुषांची अवस्था आहे. स्त्री–पुरुषांना दोन बेटावर वेगवेगळ्या ठिकाणी ठेवल तर भोपळ्याची सांगड करुन. स्त्रिया–पुरुषांकडे पोहत येतील आणि पुरुष त्यांना वाचविण्याच्या निमित्ताने त्यांच्या प्रेमात पडतील. (पुरुष टाळ्या वाजवितात)

**मुलगी** : खरं आहे आजीच म्हणणं नाही का ग मम्मी ?

**प्रिया** : अगं, वयात आल्यामुळे तुझं मतपरिवर्तन होत आहे का ?

**दुर्गा** : हा केवळ वयात येणऱ्या स्त्री–पुरुषांचा प्रश्न नाही. स्त्री–पुरुष संबंध हे मानवी जीवन आणि संस्कृती यांच्या अस्तित्वासाठी सृष्टीचा प्रवाह चिरंजीव ठेवण्यासाठी आहेत.

**सर्व** : दुर्गा माता की जय, दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी
अनाथनाथे अंबे करुणा विस्तारी.

**बाळ :** (त्याच चालीवर) वगैरे, वगैरे, वगैरे, वगैरे, वगैरे–वगैरे–मॅडम; मानवी जीवन आणि संस्कृती यांचा प्रवाह अखंड राखण्यासाठी. प्रवाह पतित झालेल्या या मुलीला माझ्याशी लग्न करायला सांगा.

**दुर्गा :** काय म्हणणं आहे तुझं मुली.

**मुलगी :** (लाजते. पायाची बोटं मोजते. बाळकडे कटाक्ष टाकते.)

**सूत्रधार :** आम्हाला उत्तर हवंय ?

**मुलगी :** मॅडम, मी लग्नाला तयार आहे !

**दुर्गा :** आणि नवऱ्या मुलाचं उत्तर काय आहे ?

**बाळ :** काही नाही मॅडम. लग्न करावं एवढंच माझं उत्तर आहे.

**सूत्रधार :** मॅडम, समाजाला भेडसावणाऱ्या यक्षप्रश्नाचं उत्तर मिळालं आहे.

**दुर्गा :** लग्नाला नाही, पण तुमचा संसार पाहायला मी येणार आहे. पण तुमचा काहीतरी गैरसमज झाला आहे. लक्षात ठेवा मी दुर्गा असले तरी दुर्गा भागवत मात्र नव्हे. (जातात)

**आई :** शुभमंगल सावधानऽऽ (लग्न लागल्याचे सनई वादनाने सूचीत होते. स्त्री–पुरुष गाणे गात नाचत जातात.)

**या ग दांड्यावरनं नवरा कुणाचा येते**
**त्याच्या करवल्या ग करवल्या नाजुक साजुक**
**त्यांच्या डोईमंदी सायबाची ग टोपी**
**त्या नेसल्या ग, नेसल्या इलायती ड्रेस**
**त्या चालल्या ग चालल्या ठुमकत ठुमकत**

(काळोख. पुन्हा क्षणात रंगभूमी प्रकाशमान होते. नवरा बायको (पिंकी आणि बाळ) नाईट गाऊनमधे. दोघांच्याही हालचाली तृप्त वैवाहिक जीवनाच्या)

**ती :** डार्लिंग, डार्लिंग, डॉन झाली ? ऊठ ना गडे !

**तो :** पहाटे पहाटे मला जाग आली.
तुझी रेशमाची मिठी सैल झाली.

**ती :** छल् ! चावट कुठला. कित्ती गुदरमवून टाकतोस रे !

**तो :** प्रिये, या चावटपणामुळेच स्त्री–पुरुष कितीही भांडली तरी संसार पांचट होत नाही. लोचटपणामुळे ती संसाराला चिकटून राहातात.

**ती :** असं काय रे गडे, पुन्हा भांडणं काढू नको हं ब्राबनिंगच्या भांडखोर

बायकांसारखं ! गडे, तू थोडा वेळ आणखी झोप घे तुला बेड–टी लागतो ना? मी करून आणते.

**तो** : नको, तू एकटीने नको !

**ती** : मी चाहाला आधण ठेवीन !

**ती** : मी त्यात साखर टाकीन !

**तो** : मी त्यात चहा पावडर टाकीन !

**ती** : दूध टाकून मी चहा गाळीन.

**तो** : एकच कप मी दोघांसाठी तयार करीन. तू बशीतून चहा पी. कारण बशी स्त्री आहे. मी कपातून चहा पिईन, कारण कप पुरुष आहे.

**ती** : आम्ही नाही जाऽऽ नको ना नॉटी डार्लिंग असं बोलू. सगळ्या गोष्टी आपण फिफ्टी, फिफ्टी करू !

**तो** : तू तुझा पगार माझ्याकडे दे ?

**ती** : मी माझा पगार तुझ्याकडे देईन !

**तो** : सर्वच गोष्टी फिफ्टी फिफ्टी ?

**ती** : होऽऽऽ

**तो** : नवनिर्माण सुद्धा ?

**ती** : होऽऽऽ सूर्याच्या तेजानं वाफळून आणि उफाळून आलेली, तप्त जमीन तू नांगर ! पेरणी कर ! मी ती फुलवीन ! सुफलाम करीन ! (हसहात)

**तो** : डार्लिंग तू कुणाची !

**ती** : डियर, तू कुणाऽऽचा ? (खळाळून हसतात)

**तो** : (द्वंद्व गीत)

**डार्लिंग सांगा कुणाची ? डार्लिंग माझ्या डियरची !**

**ती** : **डियर सांगा कुणाचा ? डियर माझ्या डार्लिंगचा !**

**तो** : **एका छोट्याश्या बंगलीत डियर–डार्लिंग ही राहतात**

**ती** : **डियर–डार्लिंग ही अनुभवती. आगळी प्रीतही जीवनाची.**

**तो.ती** : **चिमणी मुलंही सांगा कुणाची ?**

**चिमणी मुलं ही आम्हा दोघांची (हसतात)**

**(पडदा–समाप्त)**

ग्रं. क्र. 22888 नों. दि 22/8/88

# अभिप्राय

श्री. संभाजी महाडीक यांची इतर प्रकाशित नाटके व थोरांचे अभिप्राय.

## कोलंबस

❀ 'कोलंबस' हे नाटक खूपच वेगळे व नाट्य लेखनात एक नवा प्रवाह आणणारे आहे.

**—वि. वि. शिरवाडकर**

❀ प्रायोगिक रंगभूमीला वेगळ्या वाटचालीचे श्रेय मिळवून देणारी ही नाट्यसंहिता आहे.

**—महाराष्ट्र टाईम्स**

❀ कोलंबस हे नाटक म्हणजे नाट्य संस्थाना आंव्हान आहे.

**—कमलाकर नाडकर्णी**

❀ कोलंबसाच्या जीवनावर हे नाटक आहे. हे ऐकल्यावर मी आश्चर्य चकीत झालो......, कोलंबसाच्या चरित्राला अनुलक्षुन लिहिलेले इंग्रजी वा इंग्रजी भाषेतीलही एखादे पाश्चात्य नाटक वाचल्याचे कधी स्मरत नव्हते...... कोलंबस चरित्राला वाट पुसत चारित्रिक नाटक रचणे सोपे नव्हते. किंबहुना ते इतके कठीण होते की, ते असंभवनीय वाटावे. पण महाडीकांचे कर्तृत्व असे विलक्षण की त्यांनी असंभवनीय संभवाचा सुभग आकार प्रत्यक्ष केला. तो नाट्याकार मनोवेधक असाच आहे......'कोलंबस' हे नाटक आजकालच्या एकूण नाटकातही अनोखे म्हणजे अन्य चालू नाटकापेक्षा वेगळे म्हणून अनोखे असे आहे.

**—प्रा. माधव मनोहर (प्रस्तावना)**

# महापुरुष

❀ अलौकिक चरित्राचे प्रत्ययकारी दर्शन .... डॉ आंबेडकरांच्या चरित्रातील ठळक घटना निवडून त्या क्रमवार आणि काटेकोरपणे मांडल्या आहेत......आंबेडकरांनी बुद्ध धर्मच का स्विकारला याचे अगदी सुस्पष्ट चित्र उभे केले आहे......त्यांची बेडरवृत्ती आणि तर्कशुद्ध भूमिका, या सर्व गुणवैशिष्टयांचे दर्शन या नाडकातून परिणामकारकपणे घडते म. गांधींना खलनायक अथवा ब्राह्मणवर्गाला हिणकस वा हास्यास्पद नकरताही एका महापुरुषाचा प्रत्ययकारी अविष्कार कसा प्रभावीपणाने प्रकट करता येईल हेच नाटककाराने दाखविले आहे.

—सोबत : कमलाकर नाडकर्णी

❀ महापुरुष या नाटकातील आद्यन्त साधणारे सिंहावलोकनसूत्र खरोखरच नाटककाराच्या कल्पकतेचे द्योतक आहे.

—प्रा. माधव मनोहर

## एकांकिका

❀ वाढले उंच मी किती ?

❀ रंगपट

❀ लोकमान्य टिळक

---

**राजीव प्रकाशन**

६ अ, जगन्नाथ शंकरशेट रोड, मुंबई–४०००0७.

IRBK-0122464